रविवार, २५ सप्टेंबर २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ६८
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## नवीन पालकमंत्र्यांची जिल्हानिहाय यादी जाहीर

**नवी दिल्ली :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील पालकमंत्र्यांची नावे शनिवारी (दि. २४) जाहीर केली. यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूर, वर्धा, अमरावती, अकोला, भंडारा, गडचिरोली या जिल्ह्याचे पालकमंत्री असतील. नियोजन मंत्री म्हणून त्यांच्याकडे या जिल्ह्यांची जबाबदारी असेल. याशिवाय राधाकृष्ण विखे-पाटील अहमदनगर, सोलापूर; सुधीर मुनगंटीवार चंद्रपूर, गोंदिया; चंद्रकांत पाटील पुणे; विजयकुमार गावित नंदुरबार; गिरीश महाजन धुळे, लातूर, नांदेड; गुलाबराव पाटील बुलडाणा, जळगाव; दादा भुसे नाशिक; संजय राठोड यवतमाळ, वाशिम; सुरेश खाडे सांगली; संदिपान भुमरे औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर); उदय सामंत रत्नागिरी, रायगड; तानाजी सावंत परभणी, उस्मानाबाद (धाराशिव); रवींद्र चव्हाण पालघर, सिंधुदुर्ग; अब्दुल सत्तार हिंगोली; दीपक केसरकर मुंबई शहर, कोल्हापूर; अतुल सावे जालना, बीड; शंभूराज देसाई सातारा, ठाणे आणि मंगलप्रभात लोढा मुंबई उपनगरचे पालकमंत्री असणार आहेत.

**अंतरंग**

'समृद्धी'प्रमाणे नागपूर-गोवा महामार्ग साकारणार/२

नवीन पनवेलमध्ये लाच घेताना दोन जण जेरबंद/३

टेनिस सम्राट रॉजर फेडररला भावनिक निरोप/८

# ५जी सेवेची प्रतीक्षा संपली! पंतप्रधान मोदींच्या हस्ते १ ऑक्टोबरला शुभारंभ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अनेक दिवसांपासून चर्चेत असलेली ५जी इंटरनेट सेवा १ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. या सेवेचा शुभारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. केंद्राच्या राष्ट्रीय ब्रॉडबँड मिशनने ट्वीट करून ही माहिती दिली.

इंडिया मोबाइल काँग्रेस या कार्यक्रमाचे आयोजन दिल्लीतील प्रगती मैदानावर केले जाणार आहे. त्याच्या पहिल्या दिवशी पंतप्रधान मोदींच्या हस्ते दूरक्षेत्र क्षेत्रातील ५जी क्रांतीचा शुभारंभ होईल. आशियातील सर्वांत मोठा दूरसंचार, मीडिया आणि तंत्रज्ञान मंच असल्याचा दावा करून इंडिया मोबाइल काँग्रेस हा दूरसंचार विभाग आणि भारतीय सेल्युलर ऑपरेटर असोसिएशन यांनी संयुक्तपणे आयोजित केला



आहे. हा कार्यक्रम ४ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे.

केंद्रीय दळणवळण इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी, सरकारने अल्प कालावधीत देशात ५जी दूरसंचार सेवांचे ८० टक्के कव्हरेज करण्याचे लक्ष्य ठेवले आहे, अशी माहिती गेल्या आठवड्यात दिली होती.

५जी वापरकर्त्यांना ४जीपेक्षा १० पट जास्त इंटरनेट स्पीड मिळणार आहे. शिवाय ५जी सेवेद्वारे निर्माण होणाऱ्या रेडिएशनची पातळी जागतिक आरोग्य संघटनेने शिफारस केलेल्या पातळीपेक्षा खूपच कमी आहे, असेही केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटले आहे.

पहिल्या टप्प्यात ५जी सेवा देशभरातील सुमारे १३ शहरांमध्ये उपलब्ध करून दिली जाणार आहे.

# पुण्यात 'पाकिस्तान जिंदाबाद'च्या घोषणा

## पीएफआय संघटनेच्या कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल

**पुणे : प्रतिनिधी**

राष्ट्रीय तपास एजन्सीने (एनआयए) केलेल्या कारवाईविरोधात गुरुवारी (दि.३) पुण्यात पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) या संघटनेकडून आंदोलन करण्यात आले. या वेळी 'पाकिस्तान जिंदाबाद'च्या घोषणा देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आंदोलन करणाऱ्या पीएफआयच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले



होते. त्यानंतर काही आंदोलनकांनी 'पाकिस्तान जिंदाबाद', 'नारा ए तकबीर, अल्लाह हू अकबर' अशा घोषणा दिल्या. या घटनेचा व्हिडीओही सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या प्रकरणी पीएफआयचा कार्यकर्ता रियाज सय्यदसह ६० ते ७० कार्यकर्त्यांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## शिवरायांच्या भूमीत असे नारे अजिबात सहन केले जाणार नाहीत -मुख्यमंत्री

**मुंबई :** पुण्यातील घटनेच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाजकंटकांना रोखठोक इशारा दिला आहे. पुण्यात ज्या समाजकंटकांनी पाकिस्तान जिंदाबादचे नारे दिले त्या प्रवृत्तीचा करावा तेवढा निषेध कमीच आहे. पोलीस यंत्रणा त्यांच्याविरोधात योग्य ती कारवाई करेलच, पण शिवरायांच्या भूमीत असे नारे अजिबात सहन केले जाणार नाहीत, असे मुख्यमंत्र्यांनी ट्वीट करीत म्हटले आहे.

## कुठे असतील तिथून शोधून काढून कारवाई करू -उपमुख्यमंत्री

पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा कुणी महाराष्ट्रात आणि भारतामध्ये देणार असेल, तर त्याला सोडणार नाही. त्यांच्यावर कुठे असतील तिथून शोधून काढून कारवाई करू, असे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. पीएफआयविरुद्ध पुरावे केंद्र व राज्य सरकारकडे उपलब्ध आहेत. याबाबतचा तपास चालू असून यामधून अनेक गोष्टी बाहेर येतील. देशात अस्वस्थता पसरवण्याचे षडयंत्र होते, असा आरोपही त्यांनी केला आहे.

## पंतप्रधानांची रॅली होते 'पीएफआय'चे लक्ष्य



**नवी दिल्ली :** राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) आणि अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) दहशतवाद्यांशी संबंध असल्याच्या आरोपाखाली देशातील वेगवेगळ्या राज्यांत पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियाविरोधात कारवाई केली आहे. दरम्यान, पीएफआयकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाटणा येथील एका रॅलीला लक्ष्य करण्याची योजना आखण्यात आली होती, असा दावा ईडीने केला आहे तसेच भारतात वेगवेगळ्या ठिकाणी स्फोट घडवून आणण्यासाठी पीएफआयतर्फे घातक शस्त्रे आणि स्फोटके गोळा केली जात होती, असेही ईडीने म्हटले आहे.

केरळमधून पीएफआय सदस्य शफीक पायथ या आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर ईडीने हा दावा केला आहे. या दाव्यानुसार या वर्षी १२ जुलै रोजी झालेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाटणा येथील रॅलीला लक्ष्य करण्याचा पीएफआयचा कट होता.

# सेवा पंधरवड्यानिमित्त पनवेल परिसरात आरोग्य शिबिर, वृक्षारोपण

## आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती या सेवा पंधरवड्यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत शनिवारी (दि. २४) नवीन पनवेलमध्ये आरोग्य शिबिर आणि खांदा कॉलनीत वृक्षारोपण झाले. या दोन्ही ठिकाणी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



सेवा पंधरडवड्यानिमित्त नवीन पनवेल सेक्टर २ येथील कर्नाटक हॉलमध्ये मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. शिबिरात ब्लड प्रेशर, ईसीजी, रक्त तपासणी, नेत्र तपासणी व चष्मे वाटप करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अनेक गरजूंनी याचा लाभ घेतला.

या शिबिरावेळी पनवेलच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, स्थायी समितीचे माजी सभापती संतोष शेट्टी, प्रभाग समितीचे माजी सभापती समीर ठाकूर, महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्ष वर्षा नाईक, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, उद्योजक महेंद्र वावेकर, प्रभाग अध्यक्ष शिवाजी भगत, युवा अध्यक्ष मयूर आंग्रे, बूथ अध्यक्ष देवेंद्र परब, बाबू घाडीगावकर, कुलबिरसिंह चंडोक, संदीप जाधव, तन्मय बिर्जे, विवेक होन, रिमा रावल, यमुना प्रकाशन, किरण सिंह यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

भाजप महिला मोर्चा पनवेल व खांदा कॉलनी यांच्या वतीने वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. खांदा कॉलनीत झालेल्या या उपक्रमावेळी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी उपमहापौर चारुशीला घरत, भाजप महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष वर्षा नाईक, सरचिटणीस निता माळी, सदस्य निता मंजुळे, झोपडपट्टी सेल पनवेल शहर अध्यक्ष चंद्रकांत मंजुळे, महिला मोर्चा खांदा कॉलनी अध्यक्ष राखी पिंपळे, सरचिटणीस आशा मुंडे, उपाध्यक्ष सानिका इंदुलकर, सचिव संध्या जाधव, प्रेमा भोपी, खजिनदार सोनाली सावंत, सदस्य शैला मोरे, रिमा करगुटकर, सीमा निकम, सुनीता गुरव, वरिजा गुजरान, अनिता घाडगे, कांती शेट्टी, विनोदा शेट्टी, मंदाकिनी यादव, खांदा कॉलनी प्रभाग १५चे अध्यक्ष शांताराम महाडिक, सरचिटणीस भीमराव पवार, संजय कांबळे, कामगार संघटनेचे अध्यक्ष मोतीराम कोळी, भटके विमुक्त आघाडी अध्यक्ष गोपीनाथ मुंडे चिटणीस, दीपक जांभळे, सचिन मोरे, प्रवीण भोसले, ज्येष्ठ नेते युवराज बेरसे, अनिकेत काथारा, अमोल घायाळ आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## निवडक

### माजी पोलीस आयुक्त संजय पांडेंना सीबीआयकडून अटक

**नवी दिल्ली :** मुंबईचे माजी पोलीस आयुक्त संजय पांडे यांना केंद्रीय अन्वेषण ब्युरो अर्थात सीबीआयने अटक केली आहे. त्यांना यापूर्वी राष्ट्रीय शेअर बाजार को-लोकेशन घोटाळा आणि बेकायदेशीर फोन टॅपिंग प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) अटक केली होती. पांडेंना शनिवारी (दि. २४) न्यायालयात हजर करण्यात केले असता चार दिवसांची सीबीआय कोठडी सुनावण्यात आली.

### चीनचे राष्ट्राध्यक्ष जिनपिंग नजरकैदेत?

**बीजिंग :** चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांना पिपल्स लिबरेशन आर्मीच्या प्रमुख पदावरून हटविण्यात आले आहे. या हकालपट्टीनंतर त्यांना नजरकैदेतही ठेवण्यात आल्याची माहिती मिळते आहे. चीनची राजधानी बीजिंग सध्या लष्कराच्या नियंत्रणाखाली असल्याचे माध्यमांतील वृत्तांमधून सांगण्यात येत आहे.

# कर्मवीर अण्णांमुळेच आम्ही घडलो -लोकनेते रामशेठ ठाकूर

## गव्हाण विद्यालयात कर्मवीर जयंती साजरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक थोर शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यामुळेच आम्ही घडलो आणि शैक्षणिक कार्याची व दातृत्वाची प्रेरणा घेतली. अण्णांचा शैक्षणिक कार्याचा वसा समृद्ध करण्यासाठी माझ्या उत्पन्नातील वाटा सढळ हाताने मदत करताना आनंदच होतो, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शनिवारी (दि. २४) केले.

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये १३५वा कर्मवीर जयंती सोहळा व पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर अध्यक्षस्थानावरून बोलत होते. चांगले काम केले, तर चांगले फळ मिळते हे सांगतानाच आयुष्यात माणसाकडून चुका होतात, परंतु चुकांमधून जो शिकतो तोच खरा माणूस. वारंवार चुका करणारा माणूस हा वाया गेलेला माणूस ठरतो, असे परखड विचार करून त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कर्मवीर जयंती सोहळ्यानिमित्त दरवर्षी दहावी, बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वतीने कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते कै. जनार्दन आत्माराम भगत यांच्या नावाने पारितोषिक देऊन गौरविण्यात येते तसेच रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत यांच्या मातोश्री भिमाबाई जगन्नाथ वामन भगत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बक्षिसे दिली जातात. यंदाही मान्यवरांच्या हस्ते या पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. **(पान २ वर..)**

# दोन वर्षांनंतर पुन्हा घुमणार गरबा

**पाली : प्रतिनिधी**

वैश्विक महामारी कोरोनामुळे सर्व सण-उत्सवांवर निर्बंध होते. नवरात्रोत्सवात देवीची प्रतिष्ठापना करण्यात आली, मात्र सार्वजनिक कार्यक्रमांना बंदी होती. दोन वर्षांनंतर सण-उत्सव साजरे करण्यास मोकळीक मिळाली आहे. त्यामुळे यंदा तरुणाईचे आकर्षण असलेला गरबाही घुमणार आहे.

## नवरात्रोत्सवानिमित्त तरुणाईमध्ये उत्साह





नवरात्रोत्सव अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपल्याने मंडळांना देवीच्या आगमनाचे वेध लागले आहेत. मंडळांकडून नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. मंडप उभारणीचे काम जवळपास पूर्ण झाले असून सजावटीवर भर देण्यात येत आहे. भाविकांमध्येही चैतन्य निर्माण झाल्याचे पहावयास मिळत आहे.

नवरात्रोत्सवात तरुणाईला गरबा, दांडियाचे विशेष आकर्षण असते. त्यासाठी परवानगी दिली असल्याने मंडळे तसेच राजकीय पक्षांकडून विविध कार्यक्रमांबरोबरच नृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

गरब्यासाठी खास ऑर्केस्ट्रा, गायक, वाद्यवृंदासाठी आधीच बुकींग झाली आहे, तर दांडिया स्पर्धेतील बक्षिसे मिळविण्यासाठी ग्रुप्सची तयारी सुरू आहे. फॅन्सी दांडिया, विशेष कपडे, त्यावर सुसंगत ज्वेलरी बाजारात विक्रीसाठी आल्या आहेत.

एकूणच यंदाच्या नवरात्रोत्सवात प्रचंड उत्साह, जोश, जल्लोष दिसून येणार आहे.

# हिटमॅन रोहितचा विश्वविक्रम

## टी-२०मध्ये बनला सर्वाधिक षटकारांचा बादशाह

**नागपूर : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाने गुरुवारी दुसऱ्या टी-२० सामन्यात ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय मिळवला. कर्णधार रोहित शर्माने या विजयात निर्णायक भूमिक निभावली. त्याने चार षटकारांसह सर्वाधिक नाबाद ४६ धावांची खेळी केली. रोहितने या खेळीसह टी-२० क्रिकेटमधील सर्वाधिक षटकारांचा विश्वविक्रम आपल्या नावावर केला आहे.



**सर्वाधिक षटकार**

- रोहित शर्मा : १७६
- मार्टिन गुप्टिल : १७२
- ख्रिस गेल : १२४
- इयॉन मॉर्गन : १२०
- ॲरोन फिंच : ११७

रोहितने न्यूझीलंडच्या मार्टिन गुप्टीलला पछाडले. त्याच्या नावावर टी-२०मध्ये १७२ षटकारांची नोंद होती. रोहितने त्याची बरोबरी केल्याने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या सामन्याआधी रोहितला विश्वविक्रमासाठी अवघ्या एका षटकाराची गरज होती. रोहितने दुसऱ्या सामन्यात षटकार ठोकताच हा पराक्रम केला. आता रोहितच्या नावावर एकूण १७६ षटकारांची नोंद आहे.

**आज निर्णायक लढत/पान ८ वर..**

# बिबट्याची नखे विकणारी टोळी गजाआड

## माणगावमध्ये वनविभाग व पोलिसांची कारवाई

**माणगाव : प्रतिनिधी**

वन्यजीवांची हत्या करून अवयवांची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढत चालली आहे. या अवयवांना बाजारपेठेत चांगला मोबदला मिळत असल्याने अनेक टोळ्या वन्यजीवांची हत्या करून तस्करी करीत आहेत. अशाच एका टोळीतील चार आरोपींना बिबट्याची १० नखे विक्री करताना वनविभाग व पोलिसांनी माणगावमध्ये गजाआड केले आहे.



(छाया : सलीम शेख)

माणगाव तालुक्यातील कुंभार्ते गावच्या हद्दीत २१ सप्टेंबर रोजी वनविभाग आणि पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत आरोपी मंगेश लक्ष्मण कुर्मे, (वय ४५) व नईम अजीज शेख (वय ३२, दोघेही रा. निजामपूर बोरवाडी रोड) यांना बिबट्याची नखे विकत असताना सापळा रचून रंगेहाथ पकडण्यात आले. उर्वरित आरोपी दत्ता अनंत पवार (वय २२, रा. बेलवाडी कांदले, रोहा) व मंगेश गिरीजा पवार (वय ३५, रा. गारबटवाडी, रोहा) यांना दुसऱ्या दिवशी ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. या आरोपींविरोधात गुन्हा नोंदवून प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात हजर केले असता त्यांना २६ सप्टेंबरपर्यंत वन कोठडी देण्यात आली आहे.

या कारवाईत निजामपूर वनपाल संजय चव्हाण, वनरक्षक अशोक कोकडे, जर्मनसिंग पाडावी, अक्षय मोरे, वनपाल ज्ञानदेव सुभेदार, वनक्षेत्र लेखापाल हरेंद्र पालकर, वनरक्षक वैशाली मोरे, चालक विवेक जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सतिश अस्वार, शिपाई शाम शिंदे, मिलिंद खिरीट, दहिफळे, मिसाळ, पाटील यांनी सहभाग घेतला. या प्रकरणी अधिक तपास अनिरुद्ध ढगे करीत आहेत.

# शाश्वत विकासाची उद्दिष्ट्ये केंद्रस्थानी ठेवा

## ■ राष्ट्रीय कार्यशाळा समारोप कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे प्रतिपादन

**पुणे : प्रतिनिधी**

घराण्याच्या वारशातून शिवसेनेचे नेते ग्राम विकासाच्या योजनांची अंमलबजावणी करताना जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींनी शाश्वत विकासाची उद्दिष्टे विकास प्रक्रियेच्या केंद्रस्थानी ठेवावीत. त्यासाठी जिल्हा परिषद व राज्य शासनाच्या विविध विभागांनी समन्वय ठेवून यासंबंधीच्या योजना यशस्वीपणे लाभार्थींपर्यंत पोहोचवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

भारत सरकारचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्रालय आणि महाराष्ट्र शासनाचा ग्राम विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने चिंचवड येथे आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील



यांच्यासह राजेश कुमार, नागेंद्रनाथ सिन्हा, रेखा यादव, आयुष प्रसाद, मल्लिनाथ कलशेट्टी आदी वरिष्ठ अधिकारी या वेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, की संयुक्त राष्ट्रसंघाने २०१५मध्ये शाश्वत विकासाची १७ उद्दिष्टे निश्चित केली असून ती २०३०पर्यंत साध्य करायची आहेत. ग्रामपंचायतींमध्ये शाश्वत विकास ध्येयांचे स्थानिकीकरण या दृष्टीने केंद्र शासनाने नऊ संकल्पना निश्चित करून दिल्या आहेत. या संकल्पना राज्यात प्रभावीपणे राबविण्यासाठी महाराष्ट्राने पुढाकार घेतला आहे. राज्यामध्ये स्वच्छता आणि शुद्ध पाणी पुरवठा याबाबतीत मोठ्या प्रमाणावर जनजागृती झाली आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत विकास आराखडे, तसेच विविध विकास योजना व लोकसहभागाच्या माध्यमातून या १७ उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी त्यांचे स्थानिकीकरण आवश्यक आहे. ग्रामीण भागात शाश्वत विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाच्या सर्व विभागांचा सहभाग आवश्यक आहे. जिल्हा परिषदेप्रमाणे इतर विभागांच्या अधिकाऱ्यांना या प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

ग्रामसभेचा उपयोग विकासाचे चांगले नियोजन करण्यासाठी व्हावे. प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी म्हणून गावाच्या विकासात योगदान द्यावे. प्रयत्न, प्रामाणिकपणा आणि विश्वास या त्रिसूत्रीवर काम केल्यास कोणतेही उद्दिष्ट गाठता येईल आणि देशातील प्रत्येक सरपंच गावाचा विकास करण्यात यशस्वी होईल असा विश्वास केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी या वेळी व्यक्त केला. आतापर्यंत गावांच्या विकासासाठी १५व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून तीन लाख ७० हजार कोटी रुपयांचा निधी थेट ग्रामपंचायतींना देण्यात आला आहे. येत्या तीन वर्षात आणखी दोन लाख कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. गावाच्या विकासासाठी हा निधी देण्यात आला आहे. त्यातून शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करायला हवीत, असेही आवाहन त्यांनी या वेळी केले आहे.

# आमची सभा हिंदुत्ववादी विचारांची

## शिंदे गटाचे प्रवक्ते नरेश म्हस्के यांचा उद्धव ठाकरेंना टोला

**ठाणे : प्रतिनिधी**

दसऱ्या दिवशी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची होणारी सभा ही हिंदुत्ववादी विचारांची सभा नाही तर बीकेसी मैदानावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची होणारी सभा ही खरी हिंदुत्ववादी विचारांची सभा असल्याचे शिंदे गटाचे प्रवक्ते नरेश म्हस्के यांनी म्हटले आहे. ठाकरे यांची टोमणे सभा असेल असाही टोला त्यांनी लगावला आहे.



ठाण्यातील टेंभी नाका येथे आयोजित करण्यात येणाऱ्या नवरात्रोत्सवाची माहितीची देण्यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के यांच्या वतीने टेंभी नाका येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रवक्ते मस्के बोलत होते. दसरा मेळाव्यासाठी शिवाजी पार्क कोणाला मिळणार ही पूर्णपणे कायदेशीर बाब आहे. सध्या उद्धव ठाकरे यांना शिवतीर्थावर दसरा मेळावा घेण्याची परवानगी मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना प्रवक्ते म्हात्रे पुढे म्हणाले, हिंदुत्ववादी विचारसरणीचे सोने लुटण्यासाठी दसरा मेळावा आयोजित करण्यात येतो. मात्र कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस यांच्यासमवेत युती करून उद्धव ठाकरे हिंदुत्व विसरले आहेत. त्यामुळे शिवाजी पार्कवर दसऱ्यानिमित्त होणाऱ्या सभेत कोणतेही हिंदुत्ववादी विचार नसणार. तेथे केवळ टोमणे सभाच होणार आहे. दसऱ्याच्या दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची बीकेसी मैदानावर होणारी सभा हाच खरा दसरा मेळावा आणि खरी हिंदुत्ववादी विचारांची सभा असेल असाही टोला म्हस्के यांनी लगावला आहे.

आमदार, खासदार, नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते यासर्वांची गर्दी शिंदे गटाकडे आहे. त्यामुळे दसरा मेळाव्याला देखील बीकेसी मैदानावरच गर्दी दिसेल असेही म्हस्के यावेळी म्हणाले. टेंभी नाका येथील नवरात्रोत्सवात शिखर मंदिराची प्रतिकृती साकारण्यात आली आहे. कलादिग्दर्शक अमन विधाटे यांनी हा देखावा साकारल्याची माहिती म्हस्के यांनी यावेळी दिली. घटस्थापनेच्या दिवशी देवी आगमनाच्या भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात येते. यंदादेखील या मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असून त्याला मुख्यमंत्री शिंदे उपस्थित राहणार असल्याची माहितीही म्हस्के यांनी या पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

### सण-उत्सवांवरील निर्बंध हटविले

**आनंद दिघे यांनी सुरु केलेल्या या नवरात्रोत्सवाला देशभरातून नागरिक भेट देत असतात. हीच परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री एकनाथ शिंदे करत आहेत. मागील सरकारच्या काळात सण-उत्सवांवर निर्बंध लावण्यात आले होते. मात्र सध्याच्या सरकारने हे सर्व निर्बंध हटविले आहेत. लोकांनी या निर्णयाचे स्वागत देखील केले आहे. याचा प्रत्यय दहीहंडी आणि गणेशोत्सवात आला. यामुळे नवरात्रोत्सव देखील मोठ्या उत्साहात साजरा केला जाईल. तसेच टेंभी नाका येथे आयोजित करण्यात येणाऱ्या नवरात्रोउत्सवादरम्यान नऊ दिवस महिलासांठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी या वेळी बोलताना दिली.**

# गाडीच्या ब्रेकऐवजी दाबला क्लच; एकाचा मृत्यू

**ठाणे : प्रतिनिधी**

ठाण्यामधील हिरानंदानी इस्टेट इथे एका विचित्र अपघातात १९ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. ४० वर्षीय महिला वाहन चालवण्याचे प्रशिक्षण घेत असताना तिने गुरुवारी दुपारी एका डिलेव्हरी बॉयला धडक दिली. या धडकेमध्ये अजय ढोकाणे हा डिलेव्हरी बॉयचे निधन झाले.अपघातानंतर तातडीने अजयला जवळच्या रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्याचा रुग्णालयामध्ये आणण्यापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगितले. या प्रकरणानंतर संबंधित महिला घटनास्थळावरुन फरार झाली आहे.

महिलेकडे चारचाकी वाहन चालवण्याचा परवाना नसून ती वाहन चालवण्यास शिकत असतानाच हा अपघात झाल्याचे स्थानिकांनी सांगितले आहे. हिरानंदानी शाळेच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये महिला कार चालवताना दिसत आहे. ही गाडी पार्क करताना तिने ब्रेकवर पाय देण्याऐवजी क्लचवर पाय ठेवल्याचे व्हिडीओ पाहिल्यावर वाटत आहे. या महिलेच्या चुकीमुळे तिच्या गाडीच्या मागून ॲक्टीव्हावर येणाऱ्या अजयला गाडीखाली चिरडले. या अपघातामध्ये अजयच्या नाकाला आणि डोक्याला गंभीर दुखापत झाली, असे स्थानिकांनी सांगितले आहे. तसेच ही महिला रोडास एनक्लेव्ह वूडपार्क या हिरानंदानी इस्टेटमधील इमारतीत वास्तव्यास असून तिच्याकडे वाहन चालवण्याचा परवाना नसल्याचा दावा स्थानिकांनी केला आहे. अजय हा त्याच्या कुटुंबामध्ये एकमेव कमावता व्यक्ती होता. त्यामुळेच तो घरातील खर्च भागविण्यासाठी एका किराणा मालाच्या दुकानात काम करत होता. तो सामान घरपोच देऊन दुकानामध्ये परत येत असताना हा अपघात झाला, अशी माहिती अजय ज्या दुकानात काम करायच्या त्याच्या मालकाने दिली. यासंदर्भात कासारवडवली पोलीस स्थानकाचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजेश बाबशेट्टी यांनी या प्रकरणाचा तपास सुरु असल्याचे सांगितले.

# दुर्मिळ कासवांची अवैध विक्री; एकाला अटक

**नाशिक : प्रतिनिधी**

वनविभाग वन्य जीव संरक्षणासाठी प्रयत्नशील असून दुर्मिळ प्रजातीच्या प्राणी-पक्ष्यांच्या जतनासाठी काम करत आहे. नाशिक वनपरिक्षेत्रातील अधिकाऱ्यांनी भारतीय प्रजातीतील कासवाची अवैध विक्री करणाऱ्याला अटक केली आहे. या कारवाईत वनविभागाने दुर्मिळ असे इंडियन टेन्ट टर्टल कासव जप्त केले आहे.

या कासवाची अवैध्यरित्या विक्री करण्यात येत होती. या प्रकरणी एका संशयिताला अटक केली असून त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुर्मिळ कासवाची विक्री होणार असल्याची माहिती नाशिक पश्चिम वनविभागाला मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी नाशिक महामार्ग बस स्थानकासमोरील बुरहानी फिश क्रेरिअम दुकानाची झडती घेतली. या झडतीत इंडियन टेन्ट टर्टल कासव जप्त करण्यात आले.

या प्रकरणी वनविभागाच्या पथकाने खोजेमा असगरअली तिन्वा नावाच्या व्यक्तीला अटक केली असून त्याच्यावर गुन्हा दाखल केला. तिन्वा याने कासव भारतीय अधिनियम अंतर्गत समाविष्ट व संरक्षित असलेले कासव विकण्याचा प्रयत्न केला असल्याचे तपासात समोर आले आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

# मुंबईत वृद्धाला लुटले; त्रिकुटाला अटक

**मुंबई : प्रतिनिधी**

चाकूचा धाक दाखवून वृद्ध व्यक्तीच्या गळ्यातील सोनसाखळी आणि रोख रक्कम घेऊन पळ काढणाऱ्या तिघांना मुलुंड पोलिसांनी अटक केली. तिन्ही आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर विविध पोलीस ठाण्यात अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ठाणे येथील किसन नगरमध्ये वास्तव्यास असलेले मधुकर दळवी (वय ६) काही दिवसांपूर्वी कामानिमित्त मुलुंड येथे गेले होते. मुलुंडमधील लालवाणी रोड परिसरात त्यांना तिघांनी अडविले आणि चाकूचा धाक दाखवून त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी, अंगठ्या आणि रोख रक्कम असा एकूण एक लाख ८० हजार रुपयांचे ऐवज लुटून पोबारा केला. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासून एका निवासी हॉटेलवर छापा घातला आणि रमेश जैस्वाल (४४), नरेश जैस्वाल (३९) व दत्ताराम बागडे (४३) या तिघांना अटक केली. तिन्ही आरोपी चेंबूर वाशी नाका परिसरातील रहिवासी आहेत.

# नवी मुंबईतील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलला 'स्मार्ट आयसीयू' मानांकन

**पनवेल : प्रतिनिधी**

थ्रीएम इंडियाकडून कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलला 'स्मार्ट आयसीयू'हे मानांकन प्राप्त झाले आहे. कोरोना महामारीनंतर असे नामांकन मिळविणारे नवी मुंबईतील पहिलेच रुग्णालय ठरले आहे.

कोकिलाबेन हॉस्पिटल, क्रिटिकल केयरचे डायरेक्टर डॉ. भरत जिगयासी यांच्या नेतृत्वाखाली ३० पेक्षा जास्त हेल्थकेयर कर्मचाऱ्यांनी मिळून यशस्वीपणे पूर्ण केलेल्या सहा महिने चाललेल्या प्रकल्पानंतर हे मानांकन देण्यात आले आहे. आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांकडून आयसीयूमध्ये अंमलात आणल्या जाणाऱ्या सर्वोत्तम प्रथांना प्रोत्साहन देऊन आणि ज्ञान, माहितीमध्ये सुधारणा घडवून आणून आरोग्यसेवेतून मिळणाऱ्या परिणामांमध्ये सुधारणा घडवून आणण्यावर या प्रकल्पाचा भर होता. रुग्णांची सुरक्षितता व काळजी या संदर्भात मिळणारे लाभ हा या प्रकल्पाचा एक मोठा परिणाम असून वरिल मानांकनासाठी त्याची दखल घेतली जाते.

स्मार्ट आयसीयूमध्ये ज्यांचे पालन केले जाते त्या गुणवत्ता निर्देशांकांमुळे आयसीयू रुग्णांमध्ये सेकंडरी संसर्ग टाळता येतो अशा अनुपालनांचे कठोर पालन केले जाते. रुग्ण क्रिटिकल केयरमध्ये असतो तेव्हा त्याची रोगप्रतिकार क्षमता आधीच कमी झालेली असते. त्यामुळे इतर संसर्ग होण्याची शक्यता वाढलेली असते. अशा समस्या उत्पन्न होण्यापासून बचाव करण्यासाठी स्मार्ट आयसीयूमध्ये सुरक्षा उपायांची अंमलबजावणी केली जात असल्याने रुग्णांची तब्येत जलद गतीने बरी होते. रुग्णालयात जास्त दिवस राहावे लागत नाही.

रुग्णांची सुरक्षितता व काळजी या संदर्भात कर्मचाऱ्यांच्या कौशल्यांमध्ये वाढ घडवून आणल्याने रुग्णांना अतिरिक्त खर्च करावा लागत नाही. या संपूर्ण प्रक्रियेचे नेतृत्व प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर आणि मॉडरेटर डॉ. पूनम गिरी, चीफ नर्सिंग ऑफिसर डॉ. अमृता एस आणि नर्स एज्युकेटर रेखा पाटील यांच्या कोर टीमने केले.

सर्टिफिकेशनसाठीची मापदंड मार्गदर्शक तत्त्वे जागतिक आरोग्य संघटना, सोसायटी फॉर हेल्थकेअर एपिडेमियोलॉजी ऑफ अमेरिका आणि नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर क्लिनिकल एक्सलन्स यासारख्या आरोग्य सेवा संस्थांनी आखून दिलेल्या आंतरराष्ट्रीय मानकांवर आधारित आहेत.

> **केडीएएच नवी मुंबईमधील आमची टीमने या प्रकल्पादरम्यान अतिशय निष्ठेने व धैर्याने केलेले काम याचा आम्हाला अतिशय अभिमान वाटतो. कोविड-१९ सुरु झाल्यापासून क्रिटिकल केयर आणि संसर्गापासून बचाव व त्यावरील नियंत्रण यांचे महत्त्व अधिक जास्त प्रकाश झोतात आले आहे. दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात इंटरनॅशनल इन्फेक्शन प्रिव्हेन्शन वीक पाळला जातो, यासारख्या प्रकल्पांमधून मार्गदर्शक सूचनांच्या आधारे बारकाईने लक्ष ठेवण्याची आणि प्रशिक्षणामार्फत सुधारणेची प्रक्रिया सुरु राहील. जागतिक निकषांच्या आधारे कौशल्य वृद्धी व आमच्या गुणवत्ता व्यवस्थांमध्ये सुधारणा घडवून आणणे आम्ही**
>
> -डॉ. भरत जिगयासी,
> डायरेक्टर क्रिटिकल केयर
> नवी मुंबई

# लाचखोर महिला तलाठ्यास पाच वर्षांची सक्तमजुरी

**पुणे : प्रतिनिधी**

खरेदी केलेल्या जमिनीची सातबारा उताऱ्यावर नोंद करण्यासाठी दीड हजारांची लाच घेणाऱ्या महिला तलाठ्यास विशेष न्यायाधीश पी. पी. जाधव यांनी पाच वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. नोव्हेंबर २०१५ साली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने भोर तालुक्यातील सारोळा येथे ही कारवाई केली होती.

सीमा सुभाष कांबळे (वय ३५, रा. शिरवळ, जि. सातारा)असे शिक्षा सुनावलेल्या महिला तलाठ्याचे नाव आहे. कांबळे सारोळा येथे तलाठी होत्या. खरेदी केलेल्या जमिनीची सातबारा उताऱ्यावर नोंद घेण्यासाठी त्यांनी तक्रारदाराकडे दीड हजारांची लाच मागितली होती. याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यात आल्यानंतर कांबळे यांच्यावर कारवाई केली होती.

या खटल्यात सरकारी वकील ॲड. प्रेमकुमार अगरवाल यांनी सहा साक्षीदार तपासले. तक्रारदार आणि तलाठी कांबळे यांच्यात झालेले संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे. आरोपी आणि तक्रारदाराच्या आवाजाची पडताळणी करण्यात आली. आरोपीकडून तक्रारदाराच्या कामाबाबतची कागदपत्रे जप्त करण्यात आली होती, असे ॲड. अगरवाल यांनी युक्तीवादात न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. न्यायालयने साक्ष तसेच पुरावे ग्राह्य धरून वरील शिक्षा सुनावण्यात आली.

पान १ वरून

# कर्मवीर अण्णांमुळेच आम्ही घडलो -लोकनेते रामशेठ ठाकूर

या वेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, महेंद्र घरत आणि कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. जी. पवार आदींची भाषणे झाली. पवार यांनी कर्मवीर अण्णांच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग सांगून कार्यक्रमाचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याबद्दल प्रशंसोद्गार काढले. इयत्ता पाचवीचा विद्यार्थी स्मित कुंदन मोकल व इयत्ता नववीची विद्यार्थिनी दीक्षा वर्तक यांनीही कर्मवीर अण्णांच्या जीवनावर ओघवत्या भाषेत माहिती दिली. विद्यालयाच्या प्राचार्य साधना डोईफोडे यांनी अहवाल वाचन व प्रास्ताविक केले.

या कार्यक्रमास विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन आणि रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी व समन्वय समितीचे सदस्य अरुणशेठ भगत, शाळा समितीचे सर्व सदस्य, पं. स. सदस्य रत्नप्रभा घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, शरद खारकर, वसंतशेठ पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, उषा देशमुख, ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, सुनील कोळी, वामनशेठ म्हात्रे, सी. एल. ठाकूर, हरिश्चंद्र म्हात्रे, सुधीर ठाकूर, चंद्रकांत भोईर, किशोर पाटील, राजेंद्र देशमुख, भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन चंद्रकांत घरत, कांबळे गुरूजी, सुनील ठाकूर, रूपेश म्हात्रे, पी. के. ठाकूर, रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागीय कार्यालयाचे जनसंपर्क अधिकारी बाळासाहेब कारंडे, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य प्रणिता गोळे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी, रवींद्र भोईर, लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे आदी उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्यपदी नुकतीच निवड झाल्याबद्दल वाय. टी. देशमुख यांचा, आपले आजोबा हरी गणा पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून एक लाख रुपयांच्या कायम ठेव ठेवल्याबद्दल ज्येष्ठ नागरिक वसंतशेठ पाटील यांचा तसेच रयत शिक्षण संस्थेच्या स्थापना दिनानिमित्त दिला जाणारा रायगड विभागीय आदर्श विद्यार्थिनी पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल विद्यालयाची विद्यार्थिनी दीक्षा वर्तक आदींचा या वेळी विशेष सन्मान करण्यात आला.

रयत शिक्षण संस्थेचे नूतन जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख यांनी पुढील वर्षापासून एसएससी परीक्षेत विज्ञान विषयात प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी अनुक्रमे पाच हजार, तीन हजार व दोन हजार रुपयांची बक्षिसे दरवर्षी देण्याचे जाहीर केले. इयत्ता पाचवीचा विद्यार्थी स्मित मोकल या विद्यार्थ्याच्या भाषणावर सभागृह अचंबित झाले. या विद्यार्थ्याच्या भाषणाचे कौतुक करताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्याला इयत्ता दहावीपर्यंत दरवर्षी १२ हजार रुपये (प्रतिमाह एक हजार रुपये) अशी शिष्यवृत्ती या वेळी जाहीर केली.

विद्यालयाचे उपशिक्षक सागर रंधवे, प्रमोद कोळी व रवींद्र भोईर आणि लेखनिक चंद्रकांत मढवी यांच्या वतीनेदेखील विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर आणि उपशिक्षक सागर रंधवे यांनी केले, तर लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी यांनी आभार मानले.

# 'समृद्धी'प्रमाणे नागपूर-गोवा महामार्ग साकारणार

**नागपूर : प्रतिनिधी**

मुंबई समृद्धी महामार्गाप्रमाणे नागपूर-गोवा महामार्ग बनविण्याचा राज्य सरकार विचार करीत आहे. या माध्यमातून विदर्भ-मराठवाडा-पश्चिम महाराष्ट्र ते गोवा असा नवा 'इकॉनॉमिकल कॉरिडॉर' विकसित करण्यात येणार आहे, अशी माहिती महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी बोलताना दिली.



नॅशनल रियल इस्टेट डेव्हलपमेंट कॉन्सिल विदर्भ या संस्थेमार्फत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. नागपूर हे शहर लॉजिस्टिक हब म्हणून पुढे येणार आहे. नागपूर वर्धा या ठिकाणी पुढील काळात मोठ्या प्रमाणात लॉजिस्टिक सपोर्ट तयार होणार आहे. भारतातील प्रत्येक मोठ्या शहराला आठ ते दहा तासात नागपूर जोडले जाणार आहे. त्यामुळे या शहरात बांधकाम व्यावसायिक व विकासक यांना फार मोठी संधी आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यामध्ये पाच हजार किलोमीटरचे एक्स्प्रेस महामार्ग तयार करण्याचे सुतोवाच केले आहे. समृद्धी महामार्ग हा महाराष्ट्रच नव्हे तर भारतातील सर्वात मोठा इकॉनॉमिकल कॉरिडॉर म्हणून विकसित होणार आहे. यापाठोपाठ विदर्भ, मराठवाडा पश्चिम महाराष्ट्र ते गोवा हा नवा इकॉनोमिकल कॉरिडॉर तयार होत आहे. याशिवाय केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनात नागपूर दिल्ली आणि नागपूर हैदराबाद महामार्ग विकसित होणार आहे. त्यामुळे विदर्भात लवकरच नवे नागपूर, नवे वर्धा, नवे अमरावती अशी विस्तारित शहरे आकारास येणार आहेत.

सांस्कृतिक कट्टा
वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल
अमरलता
भारतरत्न लता मंगेशकर यांच्या ९३व्या जन्मदिनानिमित्त
(२५ सप्टेंबर, सायं. ५.३० वा.)

# लाच घेताना दोन जण जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

सिडको नोडल ऑफिसचे संरचनात्मक दुरूस्ती केलेल्या कामाच्या बिल मंजुरीकरिता आवश्यक असलेल्या इन्टरनल क्वॉलीटी ऑडीट रिपोर्टवर स्वाक्षरी करण्यासाठी १५ हजारांची मागणी करणाऱ्या सिडको अभियंत्यासह एका सेवानिवृत्त सहा कार्यकारी अभियंत्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नवी मुंबईच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे.



नवीन पनवेल सिडको कार्यालयात अधीक्षक अभियंता असलेल्या प्रकाश बालकदास मोहिले (वय ५७) यांनी तक्रारदाराकडून नवीन पनवेल येथील सिडको नोडल ऑफिसचे संरचनात्मक दुरूस्ती केवलेल्या कामाचे बिलमंजुरी करीता आवश्यक इंन्टरनल क्वॉलीटी ऑडीट रिपोर्टवर स्वाक्षरी करण्याकरीता १५ हजारांची मागणी केली.

या संदर्भात तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नवी मुंबईकडे तक्रार दाखल केली असता ठाणे शहर पश्चिम प्रादेशिक विभाग अप्पर पोलीस आयुक्त तथा अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र पोलीस अधीक्षक (अतिरिक्त कार्यभार) डॉ. पंजाबराव उगले, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो अपर पोलीस अधिक्षक अनिल घेरडीकर यांच्या मार्गर्शनाखाली लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने सत्येची पडताळणी करून सापळा रचला.

यानुसार नवीन पनवेल सिडको कार्यालयात तक्रारदाराकडून लाच स्वीकारताना सेवानिवृत्त सहा कार्यकारी अभियंता संजय हरिभाऊ डेकाटे (वय ५८) यांना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यानंतर मोहिले यांना कार्यालयातुन ताब्यात घेतले आहे.

# सेवा पंधरवड्यानिमित्त कामोठ्यात वृक्षारोपण

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंतच्या काळात सेवा पंधरवडा साजरा केला जात आहे. त्या निमित्ताने शनिवारी (दि. २४) कामोठे येथे वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सुषमा पाटील महाविद्यालयात हा वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाचे आयोजन रवींद्र म्हात्रे यांनी केले होते.

या वेळी भाजपचे कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक दिलीप पाटील, माजी नगरसेविका कुसुम म्हात्रे, गोपीनाथ गोवारी महिला मोर्चा कामोठे मंडल अध्यक्ष वनिता पाटील, भटके विमुक्त आघाडीच्या महिला अध्यक्षा विद्या तामखडे, आदी पदाधिकारी आणि कार्यक्रम उपस्थित होते.



# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात शिक्षक पालक बैठक उत्साहात



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि. २४) प्रथम वर्षी विद्यार्थ्यांच्या पालकांबरोबर संवाद साधण्यासाठी शिक्षक पालक बैठकीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रथम वर्षी विद्यार्थ्यांच्या पालकांना बैठकीचे आमंत्रण देण्यात आले होते.

वाणिज्य व विज्ञान विभागातील विद्यार्थ्यांचे सुमारे २०० पालक या बैठकीसाठी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी वाणिज्य व विज्ञान विभागाच्या प्रथम विद्यार्थ्यांच्या पालकांबरोबर संवाद साधला व त्यांना महाविद्यालयातील विविध उपक्रमाबद्दल विशेष माहिती देत असताना महाविद्यालयातील सर्व सुविधा, भविष्यामध्ये राबविण्यात येणारे उपक्रम याबद्दल माहिती देऊन विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण केली व पालकांच्या शंकांचे निरसन केले.

या वेळी प्रत्येक वर्गाच्या वर्गशिक्षकाने तसेच विभागप्रमुखांनी इतर विषयांच्या शिक्षकांनी पालकाबरोबर संवाद साधला व विविध कोर्सेसची व विषयाची माहिती दिली. पालकांनी सुद्धा आपले विचार मांडले तसेच सर्व शिक्षकांनी पालकांच्या विचारांचे व अपेक्षांचे आदर करित ते पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. या बैठकीचे आयोजन पालक शिक्षक संघटनेच्या समन्वयक डॉ. दिपीका हसीजा व प्रा. तनुजा सुमन यांनी केले. तसेच सर्व विभागप्रमुख, सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कार्यशाळेचे आयोजन केल्याबद्दल प्रशंसा केली. तसेच आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख व सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# पनवेल मनपातर्फे मालमत्ता करदात्यांसाठी सुवर्णसंधीची घोषणा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेने शनिवारी (दि. २४) घोषणापत्र जाहीर करून मालमत्ता करदात्यांसाठी सुवर्णसंधीची घोषणा केली आहे. यामध्ये मालमत्ता करावरील शास्तीमध्ये ५० टक्के सवलत देण्यात आली आहे. ही सवलती ३० सप्टेंबरपर्यंत असणार आहेत. दरम्यान, या घोषणा पत्रात त्यांनी म्हटले आहे की, करदात्यांनी यापूर्वीच १५ टक्के कर सवलत घेतली असती तर करदात्यांचे ११८ कोटी रुपये वाचले असते.

करदात्यांना अखेरचे सहा दिवस शिल्लक राहीले असून पालिकेने करावरील शास्तीमध्ये ५० टक्के सवलत घ्या, असे आवाहन पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे. आतापर्यंत अडीचलाख करदात्यांपैकी ६६ हजार २३५ करदात्यांनी विविध सवलती घेऊन त्यांच्या मालमत्तेचा कर पालिकेच्या तिजोरीत जमा केला आहे. यामध्ये मालमत्ता करावरील १५ टक्के सवलतीचा लाभ १२ हजार ६१ तर १० टक्के सवलतीचा लाभ सहा हजार ९७० आणि पाच टक्के सवलतीचा लाभ ४७ हजार २०४ करदात्यांनी घेतला आहे. यंदाच्या आर्थिक वर्षात पालिकेच्या तिजोरीत मालमत्ता कराचे १८२ कोटी रुपये जमा झाले आहेत. तसेच ८०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम जमा होणे अपेक्षित आहे.

# वाजेकर महाविद्यालयात भित्तीपत्रकाचे उद्घाटन

**उरण : वार्ताहर**

तु. ह. वाजेकर महाविद्यालयात मंगळवारी (दि. २०) पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात त्यांच्या जीवन कार्यावर विद्यार्थ्यांनी भित्तीपत्रके तयार केली.

या वेळी प्रा. पाटील (औंध कॉलेज, पुणे) यांनी कर्मवीरांनी केलेल्या कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य, डॉ. पी. जी. पवार उपस्थित होते. आयोजन प्रा. इनामदार मॅडम यांनी केले. या वेळी डॉ. राहुल पाटील, डॉ. विलास महाले, प्रा. राम गोसावी, डॉ. आमोद ठक्कर, डॉ. स्मिता तांदळे, प्रा. उत्तमराव घोरपडे, प्रा. दिलीप केंगार, डॉ. यशवंत गायकवाड तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

Kokilaben Dhirubhai Ambani
hospital
NAVI MUMBAI
Every Life Matters



उत्कृष्ट वैद्यकीय सेवेचे
तुमच्यासाठी एकमेव रुग्णालय



३०० बेड्स
विश्वस्तरिय आधुनिक पायाभूत सुविधा
२५४ स्पेशलाईज्ड डॉक्टर्स
लेवल-१, २४ तास अपघात व आपत्कालीन विभाग
लेवल-३ (सर्वोच्च) जागतिक दर्जाचे क्रिटिकल केअर युनिट
७ उत्कृष्ट केंद्रे
(कर्करोग, क्रिटिकल केअर, कार्डिॲक, अपघात व आपत्कालीन प्रसंग, न्यूरोसायन्स, हाडे व सांधे (ऑर्थोपेडिक्स), माता व बालक)
२० स्पेशालिटी विभाग
(इंटरनल मेडिसिन व संसर्गजन्य आजार, किमान छेदाच्या शस्त्रक्रिया)
निदान व उपचारात्मक एन्डोस्कोपी, एन्डोक्रिनोलॉजी इत्यादी)
१८ सुपर स्पेशालिटी क्लिनिक्स
विविध स्पेशालिटीजमध्ये श्रेणीतील सर्वोत्कृष्ट तंत्रज्ञान
(३ टेस्ला MRI, कर्करोगासाठी टू बीम रेडिएशन, २५६ स्लाईस CT, EUS, EBUS, सांधे प्रत्यारोपणसाठी रोबोट )

जागतिक दर्जाच्या परिणामांचा विश्वास

EMERGENCY +91 22 7198 1111
APPOINTMENTS & BOARD LINE +91 22 7197 9797

Thane-Belapur Road, Opp Koparkhairane Station, Navi Mumbai – 400 710, India; navimumbai.kokilabenhospital.com /KDAHNaviMumbai

# असा बदल, ज्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही!



अर्थ प्रहर




यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

**शेअर बाजारात गुंतवणूक करणाऱ्या भारतीय नागरिकांची संख्या वेगाने वाढून ती गेल्या महिनाअखेर १० कोटींवर गेली आहे. विकसित देशांत तब्बल ५५ टक्के नागरिक शेअर बाजारात गुंतवणूक करतात आणि भारतात हेच प्रमाण केवळ पाच ते सहा टक्के आहे. भारतात होत असलेल्या या बदलाकडे दुर्लक्ष करायचे की त्यात भाग घ्यायचा, हा ज्याच्या त्याच्या निवडीचा विषय असला तरी हा बदल नजीकच्या भविष्यात आणखी वेग पकडणार आहे.**

गेले काही दिवस शेअर बाजारात होत असलेल्या घडामोडींकडे आपल्याला अजिबात दुर्लक्ष करता येणार नाही. अगदी अलीकडे अमेरिकन फेडने व्याजदरात वाढ केली आणि त्यानंतर जगभरातील बाजार कोसळले तसेच भारतीय रुपया आणखी कोसळला, हे त्याचे कारण नाही. शेअर बाजारात या गोष्टी काही नव्या नाहीत. शेअर बाजाराला वर जाण्यास आणि खाली येण्यास काहीतरी निमित्त हवे असते. फेडने केलेली व्याजदरवाढ ही तशीच घटना आहे. अर्थात, अलीकडच्या काळातील ही एक मोठी घटना आहे आणि तिचे परिणाम व्यापक स्वरूपाचे आहेत. पण असे असूनही पुन्हा उंचीवर पोचलेला भारतीय शेअर बाजार वेळप्रसंगी तिच्याकडेही दुर्लक्ष करून पुढील वाटचाल करत राहील, त्याचे कारण काही वेगळे आहे. ते कारण म्हणजे भारतीय गुंतवणूकदारांच्या विचारात झालेला बदल.

कोरोनाच्या काळात घरात कोंडून घ्यावे लागलेल्या भारतीयांनी शेअर बाजारात आपले नशीब आजमावून पाहिले आणि त्यातील अनेकांनी त्यात कमाईही केली. अशा कमाईची जेव्हा चर्चा होऊ लागली तेव्हा जे शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी काठावर बसले होते, त्यांनीही त्यात उडी घेतली. त्याचा परिणाम असा झाला की जगात आणि भारतातही अर्थव्यवस्थेविषयी चिंता व्यक्त केली जात असताना भारतीय शेअर बाजाराच्या सेन्सेक्सने पुन्हा ६० हजारांचा टप्पा गाठला. भारतीय शेअर बाजार विदेशी गुंतवणूकदारांवर अवलंबून आहे, असे म्हटले जाते. ते गुंतवणूकदार भारतीय बाजारातून पैसे काढून घेत असताना ही किमया घडली! त्याचे खरे कारण म्हणजे शेअर बाजारात थेट गुंतवणूकदारांची वाढलेली संख्या होय. ती संख्या गेल्या ऑगस्टअखेर प्रथमच १० कोटी इतकी झाली आहे. म्हणजे शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी जे डीमॅट खाते काढावे लागते, ते काढणाऱ्यांची संख्या प्रथमच एवढी झाली आणि या वेगाने ही खाती प्रथमच काढली गेली. गेल्या एका वर्षभरात तब्बल ३.३० कोटी डीमॅट खाते काढली गेली आहेत. यातील प्रत्येकाने सरासरी अगदी १० हजारच रुपये गुंतविले आहेत, असे गृहीत धरले तरी भारतीय शेअर बाजारात किती निधी या काळात आला, याची कल्पनाच करून पहा. २०२०पासून शेअर बाजारात जी ६० टक्के वाढ झाली, तिचे एक प्रमुख कारण हे आहे.

भारतीय शेअर बाजारात हा जो बदल पाहायला मिळतो आहे, त्याची अनेक कारणे आहेत. त्यातील प्रमुख अशी -१. कोरोनाच्या काळात इतर सर्व व्यवहार बंद होते, मात्र शेअर बाजाराचे डिजिटलायझेशन झाल्यामुळे तो चालू असल्याने या गुंतवणुकीकडे नव्या गुंतवणूकदारांचे लक्ष गेले. २. ईकेवायसी आणि आधार ईसाईनच्या सोयीमुळे घरी बसल्या डीमॅट खाते काढणे शक्य झाले. ३. सेन्ट्रल डिपोझीटरी सर्व्हिस (सीडीएसएल) आणि एनएसडीएलसारख्या संस्थांनी आपले काम चोख केल्यामुळे तसेच सेबीने बाजारातील गैरप्रकार रोखण्यासाठी प्रयत्न केल्याने बाजाराची विश्वासाहर्ता वाढली. ऑगस्टअखेर सीडीएसएलकडे ७ कोटी तर एनएसडीएनएलकडे २.८८ कोटी खातेदार झाले आहेत. ४. बँकेचे व्याजदर कमी झाल्याने (जी अंतिमत: चांगली बाब मानली जाते) ठेवीदारांही कमी व्याजदर मिळू लागल्याने त्यापेक्षा अधिक परतावा देणाऱ्या शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडाच्या गुंतवणुकीकडे गुंतवणूकदारांचे लक्ष गेले. म्युच्युअल फंडातील वैयक्तिक गुंतवणूकदारांचा एकूण निधी २२.३७ लाख कोटींवर गेला, हा त्याचाच परिणाम आहे. शेअर बाजार याकाळात चांगलाच वर गेल्याने या गुंतवणूकदारांना चांगला परतावा मिळाला. हा बहुतांश पैसा शेअर बाजारात गुंतविला जात असल्याने बाजार हलता राहिला. एका महिन्याला एसआयपीच्या मार्गाने तब्बल १२ ते १५ हजार कोटी रुपये म्युच्युअल फंडात गुंतविले जात असून हेही भारतात प्रथमच घडले आहे. ५. गुंतवणुकीच्या सवयीतील हा बदल केवळ महानगरांपुरता मर्यादित राहिला नाही, जागरूकता आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे छोटी शहरे आणि ग्रामीण भागातील गुंतवणूकदारांनी शेअर बाजाराच्या गुंतवणुकीत भाग घेण्यास सुरवात केली. ६. कोरोनाच्या संकटानंतर भारतीय अर्थव्यवस्था सर्वात आधी रुळावर आली, त्यामुळे भारतात व्यवसाय करणाऱ्या कंपन्यांचे नफे याकाळात वाढले. साहजिकच अनेक कंपन्यानी आपल्या फायद्यात शेअरधारकांना सामावून घेतले, त्याचा चांगला परिणाम झाला. शेअर स्पीलट, बोनस शेअर, लाभांश वाटप, बायबॅक अशा मार्गांनी हे केले गेले.




शेअर बाजारात गुंतवणूक करावयाची की नाही, हा अजूनही आपल्या देशात संभ्रमाचा विषय आहे. या गुंतवणुकीवरील काही आक्षेप काही प्रमाणात बरोबर असले तरी कंपन्यांना भांडवल उभारणीचा तोच सर्वात चांगला मार्ग आहे, हे विसरता येणार नाही. म्हणूनच जगभर भांडवल उभारणीसाठी शेअर बाजाराचा आधार घेतला जातो. अमेरिका आणि सर्व युरोपीय प्रगत देशात शेअर बाजारात गुंतवणूक करणाऱ्या नागरिकांचे प्रमाण सरासरी ५५ टक्के आहे, तर आज भारतात हेच प्रमाण अजूनही ५ ते ६ च टक्के आहे. त्या देशांच्या विकसित होण्याला हेही एक कारण आहे. शेअर बाजारातील पैसा हा उद्योग व्यवसाय वाढविण्याच्या कामी येतो. याचा अर्थ तो सतत फिरत राहतो. पैसा फिरत राहणे, ही कोणत्याही अर्थव्यवस्थेची गरज असते. त्यामुळे शेअर बाजाराच्या गुंतवणुकीवरील सर्व आक्षेपांचा विचार केलातरी आजच्या अर्थव्यवस्थेत त्याला पर्याय नाही, हे लक्षात घ्यावे लागेल.

अर्थात, लगेच विशेषतः नव्या गुंतवणूकदारांनी शेअर बाजारात गुंतवणूक करावी, अशी आजची स्थिती नाही. रशिया युक्रेन युद्ध आणि महागाईमुळे जगाच्या अर्थव्यवस्थेवर झालेल्या विपरीत परिणामांचा विचार करता केवळ भारतच नव्हे तर जगातील शेअर बाजार सतत दोलायमान राहणार आहेत. भारतीय अर्थव्यवस्था तुलनेने खूपच स्थिर असल्याने भारतीय शेअर बाजाराने याच काळात मोठी झेप घेतली आहे. त्यामुळे जगातील इतर शेअर बाजाराच्या तुलनेत भारतीय बाजार महाग झाला आहे. याचा अर्थ तो कधीही आणखी कोसळू शकतो. ते एक वळण पूर्ण झाले की मात्र भारतीय अर्थव्यवस्थेवर नेहमीच विश्वास दाखविणारे परकीय गुंतवणूकदार पुन्हा भारतात पैसा ओतण्यास सुरवात करतील आणि भारतीय बाजार नव्या विक्रमाला गवसणी घालण्यास सज्ज होईल. या बदलात भाग घ्यायचा की नाही, हा मात्र ज्याच्या त्याच्या निवडीचा विषय आहे. या बदलाकडे फारकाळ दुर्लक्ष करता येणार नाही, हे मात्र तेवढेच खरे!

◆◆◆

### अर्थसाक्षर स्पर्धा : ३७
**निकाल पुढीलप्रमाणे**

**१. शेअर बाजाराच्या निफ्टी इंडेक्समध्ये किती कंपन्यांचा समावेश आहे?**
*इ.* ५०

**२. भारतात सध्या एलआसीसह एकूण किती जीवन विमा कंपन्या आहेत?**
*अ.* २४

**३. क्रिप्टो करन्सी तयार करताना कोणत्या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो?**
*अ.* ब्लॉकचेन

**दै. रामप्रहरच्या अंकात दर रविवारी रविप्रहर या पानावरील अर्थप्रहर सदरात प्रसिद्ध होणारे अर्थविषयक लेख आणि प्रश्नोत्तरे येत्या १ ऑक्टोबरपासून समाप्त होत आहेत. वाचकांनी त्यास दिलेला प्रतिसाद पाहता यापुढेही 'रामप्रहर'मधून अर्थविषयक घडामोडी वाचकांपर्यंत वेळोवेळी पोहचविण्याचा आमचा प्रयत्न राहील.**

# चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या आठवणी आजही ताज्या!



**भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात जे जे उठाव झाले त्यात चिरनेरचा जंगल सत्याग्रहाचा आवर्जून समावेश करावा लागेल. ब्रिटिशांच्या विरोधात ज्या शूरवीरांनी आपल्या प्राणाची आहुती देऊन हौतात्म्य पत्करले त्यात चिरनेर जंगल सत्याग्रहातील शूरवीर धाकू गवत्या फोफेरकर, नाग्या महादू कातकरी दोघेही चिरनेर, आलू बेंमट्या म्हात्रे-दिघोडे, आनंदा माया पाटील-धाकटी जुई, रामा बामा कोळी-मोठीजुई, रघुनाथ मोरेश्वर शिंदे (न्हावी)-कोप्रोली, हसुराम बुधाजी घरत-खोपटे व परशुराम रामा पाटील-पाणदिवे या हुतात्म्यांचा प्रामुख्याने सहभाग होता. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाचे बलिदान देणाऱ्या या विरांना ही मातृभूमी कधीच विसरणार नाही. येथील हुतात्म्यांच्या नावाने उभारण्यात आलेली स्मारके आजही प्रेरणादायी ठरली आहेत. १९३०च्या कायदेभंग चळवळीत २५ सप्टेंबरच्या सत्याग्रहातील गोळीबार प्रकरणामुळे चिरनेर गावाचे नाव साऱ्या महाराष्ट्र राज्यासह हिंदुस्तानात गाजत आहे. चिरनेर जंगल सत्याग्रहाचा हा लढा भारत देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा आहे...**



महात्मा गांधींच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा एक भाग म्हणून चिरनेर येथे जंगल सत्याग्रह करण्यात आला. जंगल सत्याग्रह या नावातूनच सत्याग्रहाचा हेतू स्पष्ट होतो. हा सत्याग्रह अनेक कारणामुळे वैशिष्ट्यपूर्ण मानावा लागेल. या सत्याग्रहाला सामान्य जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. या उरणच्या खेड्यापाड्यातील सामान्य जनता ब्रिटिश सत्तेविरोधात एवढ्या एकजुटीने उभी ठाकली होती की, ब्रिटिश सरकारच्या अधिकाऱ्यांना दहशतकारी मार्गाचा अवलंब करण्याची वेळ आली. मात्र सत्याग्रहींनी अहिंसात्मक असे धोरण स्विकारले आणि ब्रिटिश राजवटीचे सारे अत्याचार सहन केले. या सत्याग्रहाचे नेतृत्व भाईसाहेब गुप्ते यांच्याकडे होते व हा सत्याग्रह दडपणाचे प्रयत्न तत्कालीन ब्रिटिश सरकारने चालविले होते. मात्र पोलिसांची दडपशाही झुगारून हजारो लोक सकाळपासूनच चिरनेरच्या आक्कादेवीच्या माळरानावर एकत्र आले होते. इन्स्पेक्टर रामचंद्र दौलत पाटील हेदेखील हत्यारी पोलिसांच्या तुकडीसह घटनास्थळी दाखल झाले. मात्र या गोष्टीचा अंदाज घेऊन मामलेदार केशव जोशीही चिरनेर येथे जातीने हजर होते. या वेळी हजारो सत्याग्रहांची मिरवणूक शांततेने निघाली होती.



यात उरण तालुक्यातील चिरनेर कळंबुसरे, कोप्रोली, मोठी जुई, धाकटीजुई, दिघोडे, खोपटे, सारडे, पांणदिवे, पिरकोण, पाले, आवरे, गोवठणे या गावातून हजारोंच्या संख्येने शेतकरी तरुण सहभागी झाले होते. सत्याग्रहाच्या प्रेरणेने भारावून गेलेल्या तरुणात काही उमदे तरुण नुकतेच लग्न झालेले हे तरुण भारत मातेच्या मुक्तीसाठी पेटून उठले होते. या वेळी बऱ्याचशा सत्याग्रहींच्या हातात कोयते, कुऱ्हाडी व काठ्या होत्या. त्यांनी जंगलातील झाडे तोडून कायदेभंग करण्यास प्रारंभ केला आणि जंगल का कायदा तोड दिया अशा घोषणांनी सारे जंगल दणाणून गेले होते. जंगलातील झाडे तोडणाऱ्यांना पोलीस अटक करण्यासाठी घेऊन जात होते. मात्र मामलेदार केशव जोशी यांनी सत्याग्रहींच्या हातातील बेड्या काढण्यास पोलीस फौजदाराला आदेश दिले परंतु पोलीस इन्स्पेक्टर रामचंद्र पाटील यांनी मामलेदारांचे आदेश धुडकावून लावून सत्याग्रहींना अमानुष मारझोड सुरू केली. ऑर्डर ऑफ फायरची आज्ञा द्या, असे फौजदार रामचंद्र पाटील हे मामलेदार केशव जोशी यांना वारंवार सांगत होते. परंतु मामलेदार केशव जोशी यांनी सक्त ताकीद दिली होती की, कुणीही गोळीबार करावयाचा नाही असे सांगूनसुद्धा मातीशी बेइमानी करणाऱ्या या पोलीस इन्स्पेक्टरने ब्रिटिशांचा तुकडा खाल्ला होता. त्यामुळे गोळीबारास विरोध करणाऱ्या मामलेदार केशव जोशी यांचा त्यांनी पहिला बळी घेतला आणि मोठ्याने फायर, फायर असे ओरडून गोळीबार सुरू केला. बेछुट गोळीबारात जागीच बारा हुतात्मे झाले अत्यंत शांततेने चाललेल्या या सत्याग्रहाला हेकट व खूनशी स्वभावाच्या पोलीस अधिकाऱ्यांमुळे गालबोट लागले. पोलिसांच्या गोळीबारात सात सत्याग्रहींना व काही महिन्यानंतर पोलीस गोळीबारात जखमी झालेल्या नाग्या महादू कातकरी यालाही आपले प्राण गमवावे लागले. या सत्याग्रहाच्या स्वातंत्र्य लढ्यात आठ शूरवीर देशभक्तांनी आपल्या प्राणाची आहुती दिली तर मामलेदारासह पाच सरकारी कर्मचाऱ्यांना यावेळी आपले प्राण गमवावे लागले. दरम्यान बहुजन समाजाचे पुढारी व आमदार नारायण नागु पाटील यांना या घटनेची माहिती मिळताच ते चिरनेर येथे आले आणि कोठडी वजा देवळासमोर गेले आतील दृश्य पाहून त्यांचा संताप आनावर झाला. आम्हाला देवदर्शन घ्यायचे आहे. त्यासाठी दरवाजा उघडा, असे पहारेकरी शिपायाला सांगितले. पण त्या शिपायाने साहेबांची परवानगी आणावी लागेल, असे सांगताच आमदार पाटील यांच्या अंगाचा तिळपापड झाला आणि ते कडाडले. जा तुझ्या साहेबाला सांग आणि लगेच त्यांनी दरवाजाला धडक दिली आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सत्याग्रहींना केलेल्या अमानुष मारहाणीबद्दल जाब विचारला. इतकेच नव्हे तर आमदार पाटील यांनी सभागृहामध्ये या अमानुषतेला वाचा फोडली. या सत्याग्रहात सहभागी झालेल्या ४७ जणांवर सरकारने खटले दाखल केले होते. यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चिरनेर आरोपींच्या खटल्यातील काम पाहिले होते. या स्वातंत्र्य लढ्यात पनवेलच्या गुप्ते घराण्याचे योगदान मोलाचे असून, चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांची स्मृती जागविण्यासाठी एकेकाळचे क्रांतिकारी देशभक्त सेनापती बापट यांच्या अध्यक्षतेखाली पहिला हुतात्मा स्मृतिदिन चिरनेर येथील याच आक्कादेवीच्या माळरानावर साजरा करण्यात आला होता. यावेळी मातीच्या स्मारकाला सर्वांनी दिलेली ही पहिली मानवंदना होय.

या घटनेला आज २५ सप्टेंबर २०२२ रोजी ९२ वर्ष पूर्ण होत आहेत. या स्मृतिदिनाच्या समारंभाला आमदार पाटील, भाईसाहेब गुप्ते, नानासाहेब बेडेकर, डॉक्टर खैरे, नाना कुंटे, विनायकराव गोविलकर, स्वयंसेवक व देशसेवकांची पथके तसेच चिरनेर व परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते. ब्रिटिश राजवटीत संपन्न झालेला हा २५ सप्टेंबर १९३० सालचा पहिला हुतात्मा स्मृतिदिन गणला जात आहे.

**-जीवन केणी, उरण**


◆◆◆

### हुतात्मा स्मृतीस्तंभ सर्वांसाठी प्रेरणादायी

गेली कित्येक वर्ष २५ सप्टेंबरच्या दिवशी या हुतात्मा स्मारकाला शासकीय मानवंदना दिली जाते. हे स्मारक म्हणजे वास्तुशास्त्राचा एक उत्कृष्ट नमुना आहे. हा स्मृतीस्तंभ दंडगोलाकार आहे, त्याच्या कळसावर ज्योत दिसून येते. चारी बाजूला वंदे मातरम्च्या पाट्यांमध्ये प्रत्येकी तीन नावे असून त्यांची संख्या १२ आहे. मामलेदारांसह सरकारी पाच लोक आणि जनतेपैकी सात जणांची नावे होती. शासनाच्या वतीने वंदे मातरम्ची एक पाटी कमी करून आदिवासी हुतात्मा नाग्या कातकरी यांचेही नाव २३ जानेवारी २००२ रोजी स्तंभावर आले आहे. त्यामुळे स्मृतीस्तंभावरील नावांची संख्या आता १३ दिसून येत आहेत. चिरनेर येथे साधारण एक चौरस फुटाच्या क्षेत्रावर हे स्मारक उभारले गेले आहे. या स्मारकाच्या दर्शनी भागात २५ फूट उंचीचा स्तंभ बांधला गेला आहे. या स्तंभाच्या टोकावर स्मारकाचे बोधचिन्ह म्हणून स्मशाल दिसून येते. स्मारकामध्ये असलेले सभागृह हे स्मारकाचे आकर्षण आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाचे बलिदान देणाऱ्या या वीरांना ही मातृभूमी कधीच विसरणार नाही. चिरनेर गावात गणपतीच्या देवळाजवळ आज अस्तित्वात असलेले हे हुतात्मा स्मृतीस्तंभ (दगडी स्मारक) सर्वांनाच प्रेरणा देणारे ठरले आहे.

# वाचनाने विचार समृद्ध होतात


वाचनाने विचार समृद्ध होतात, विचारशक्ती, कल्पनाशक्ती वाढते. मनुष्य चिंतनशील बनतो. पुढे तो स्वत:चे विचार मांडायला लागतो. त्याचे विचार तर्कसंगत असल्यास इतरांना त्याचा फायदा होतो. वाचनाने मनुष्य ज्ञानी होतो. ते ज्ञान म्हणजे मूल्यवान संपत्तीच होय. संत तुकाराम महाराज म्हणतात, आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने. अर्थात ग्रंथरुपी ज्ञानाला ते संपत्ती समजतात. ह्या संपत्तीची बरोबरी सोने, रुपे, किंवा हिऱ्यांनी होत नाही. म्हणून वाचन केले पाहिजे. पुस्तके नव्या जगाचे, नव्या विचारांचे दरवाजे उघडतात. पुस्तके वाचल्याने सभोवतालच्या संकुचित जगापलीकडचे जग, संस्कृती समजते. त्यामुळे ज्ञानसमृद्धी होते. प्रसंग, कथा वाचल्याने कल्पनेला व बुद्धीला खाद्य मिळते. पुन्हा-पुन्हा वाचताना त्याच घटनांकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहता येते. प्रत्येक वेळी त्यात नवा अर्थ सापडू शकतो. त्यातून मिळणारा आनंद सृजनशील असतो.



श्री. दिलीप प्रभाकर गडकरी, कर्जत

वाचाल तर वाचाल

साहित्यिकांची आवडती पुस्तके



## माझं क्षितिज - डॉ. नितीन आरेकर


डॉ. नितीन दत्तात्रेय आरेकर यांचं माझं क्षितिज हे पुस्तक माझ्या वाचनात आले. शब्दांकित या पुस्तकाप्रमाणे त्यांनी तबला वादक झाकीरहुसेन, गायक शंकर महादेवन इत्यादी मान्यवरांच्या बरोबर त्यांची आई आणि आजी (वडिलांची आई) यांच्यावर स्वतंत्रपणे लेख लिहिले आहेत. या दोन्ही लेखात आईच्या व आजीच्या तर आठवणी सांगितल्या आहेतच, परंतु घराण्यातील सर्व नातलगांचा उल्लेख केला आहे. त्यांच्या लेखातून लक्षात येतं की आजीने त्यांचे खुप लाड केले आहेत तर आईने त्यांच्यावर जसा प्रेमाचा वर्षाव केला तसेच त्यांना शिस्त लावली व त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्यासाठी प्रयत्नं केला. नितीन आरेकर यांना वाचनाची व लेखनाची आवड त्यांच्या आईनेच लावली. या पुस्तकातील गुणवंतांच्या मांदियाळीत आई व आजी यांना बसवून आरेकर यांनी त्यांचा सन्मान केला आहे. आई आणि आजी यांच्याबद्दल माहिती सांगत असताना स्वत:बद्दल माहिती देऊन आत्मचरित्राची थोडी झलक दाखवली आहे असे वाटते.



डिंपल प्रकाशनतर्फे प्रकाशित झालेल्या १४९ पानी पुस्तकाची किंमत अवघी दोनशे रुपये असून झाकीर हुसेन, बेगम परवीन सुलताना, तौफिक कुरेशी, विनोदी अभिनेता जॉनी लिव्हर या अमराठी मान्यवरांच्या नितीन आरेकर यांनी मुलाखती घेऊन त्यांचे मराठीत शब्दांकन अशा तर्हेने केले की पुस्तक वाचताना जणू हे मान्यवर आपल्याशी प्रत्यक्ष बोलत आहेत असे वाटते. हे नितीन आरेकर यांचे लेखन कौशल्य आहे. ही दोन्ही पुस्तकं प्रत्येकाने जरूर वाचावित.

## शब्दांकित -डॉ. नितीन आरेकर

शब्दांकनकार नितीन आरेकर यांचे शब्दांकित या पुस्तकात डॉ. अमोल कोल्हे, वैशाली पाटील, उस्ताद तौफिक कुरेशी,श्रीधर फडके, शंकर महादेवन, नितीन चंद्रकांत देसाई, संगीतमार्तंड उस्ताद दिलशाद खाँ अशा अभिनेते, संगीतकार, दिग्दर्शक, गायक, वादक, समाजसेवी व्यक्तींचे शब्दांकन आहे. हे यापुर्वी विविध दैनिकं, मासिकं यामध्ये प्रसिध्द झाल्यानंतर नितीन आरेकर यांच्या चाहत्यांनी व प्रकाशकांनी सर्व लेख पुस्तक रूपाने प्रकाशित करावे, असे सुचवले व आरेकर यांनी सर्वांच्या विनंतीला मान देऊन हे पुस्तक प्रकाशित केले.



नितीन आरेकर यांच्या म्हणण्यानुसार शब्दांकन ह्या लेखनप्रकाराकडे अभ्यासकांचे फारसे लक्ष गेलेले नाही. आरेकर यांच्या मते 'एखादा नट परकाया प्रवेश करून अभिनयाची विविध क्षितिजे धुंडाळण्याचा प्रयत्नं करतो तसंच ह्या साहित्य प्रकाराबाबत आहे.' ते म्हणतात की आज प्रचलित असलेल्या मराठीतील पहिला उपलब्ध ग्रंथ लीलाचरित्र हे म्हाइंभट यांनी केलेलं चक्रधर स्वामींच्याविविध शिष्यांनी स्वामींबद्दल सांगितलेल्या आठवणींचे ते शब्दांकन आहे. इतक्या जुन्या परंतु दुर्लक्षित साहित्य प्रकाराकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्नं नितीन आरेकर यांनी केला व त्यास वाचकांनी व प्रकाशकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. ह्या पुस्तकात नितीन आरेकर यांनी एकवीस व्यक्तींचे शब्दांकन केले आहे. बाविसावा लेख शब्दांकन : वैशिष्ठ्यपूर्ण साहित्यप्रकार ह्या विषयावर लिहिला आहे. अशा प्रकारचे लेखन करावे, असे जर कोणाला वाटले तर त्यांच्यासाठी हा लेख खूप उपयुक्त आहे. मराठी भाषेचे प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, नवोदित लेखक यांनी हे पुस्तक संग्रही ठेवावे.




## 'ती'चं मनोगत -डॉ. उज्ज्वला करंडे

डॉ. उज्ज्वला भालचंद्र करंडे यांचे १५ डिसेंबर २०२० रोजी प्रकाशित झालेले 'ती' चं मनोगत हे पुस्तक वाचले. या पुस्तकाच्या लेखिका करंडे यांना स्त्री विषयक संशोधनासाठी पीएचडी प्राप्त झाली आहे. त्या ३८ वर्षे मानसशास्त्र या विषयाचे अध्यापन करत होत्या. 'भारतीय स्त्री शक्ती' ह्या संघटनेच्या त्या दहा वर्षे सक्रिय कार्यकर्त्या होत्या. त्यामुळे त्यांना स्त्रियांच्या समस्यांसंदर्भात चांगली जाण आहे.

भारतात १८७६ साली बंगाली भाषेत 'आमार जीवन' हे पहिले आत्मचरित्र राससुंदरी देवींनी लिहिले तर १९१० साली न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या पत्नी रमाबाई रानडे यांनी आमच्या आयुष्यातील काही आठवणी ह्या नावाने लिहिलेले आत्मचरित्र हे पहिले मराठी आत्मचरित्र आहे.त्यानंतर अनेक महिलांनी आत्मचरित्र लिहिली आहेत.

एका लोकप्रिय दैनिकासाठी करंडे यांनी स्त्री-आत्मचरित्रासंदर्भात एक सदर वर्षभर चालवले. ते वाचकांना खुप आवडले. त्या सर्व लेखांचा समावेश असलेले 'ती'चं मनोगत पुस्तक तयार झाले. या पुस्तकात गृहिणी, लेखक/कवी पत्नी, चित्रतारका, सामाजिक कार्यकर्त्या, दलित स्त्रिया, कलावंत, लेखिका, गायिका, राजकीय क्षेत्रांतील स्त्रिया यांची आत्मचरित्र यांचा समावेश केला आहे. प्रभा अत्रे, दुर्गा खोटे, हंसा वाडकर, शांता हुबळीकर, अनुताई वाघ इत्यादी नामवंत महिलांच्या आत्मचरित्राचा यात समावेश आहे.



अनेक वर्ष मानसशास्त्र या विषयाचे अध्यापन, मराठी साहित्याची चांगली जाण, स्त्री जीवनाबद्दलची आस्था आणि लेखिकेची जीवनदृष्टी याचा संगम म्हणजे 'ती'चं मनोगत हे पुस्तक आहे. यात मराठी स्त्रीजीवनाचे अस्सल चित्रण केले आहे. सर्व आत्मचरित्रातून वेगवेगळ्या महिलांनी आपापल्या पध्दतीने आपल्या वेदना उलगडून दाखवल्या होत्या. लेखिका उज्ज्वला करंडे यांनी सर्वांच्या भावनांचा एकत्रित अभ्यास करून अनेकांतून एकता साधत आपल्या खास शैलीत प्रातिनिधिक स्वरूपात एका स्त्रीचं मनोगत आहे. ह्या भावनेने शब्दांकन केले आहे म्हणून त्यांनी पुस्तकाला 'ती'चं मनोगत हे नांव दिले आहे. अन्यथा 'त्यां'चं मनोगत असे नांव द्यावे लागले असते.स्त्री म्हणजे जिद्द, ईर्षा, चेतना, कल्पना, सर्जकता, बुध्दिमत्ता ही वैशिष्टय असलेले मानवी मन आहे हे जरी प्रत्येक कुटुंबात ठसले तरी स्त्री-पुरुष समानता वास्तवात उतरेल असे उज्वला करंडे यांचे म्हणणे आहे. प्रत्येकाने हे १८४ पानी पुस्तक वाचलं पाहिजे आणि शक्य असेल तर संग्रही ठेवलं पाहिजे.

मला खात्री आहे जे जे वाचक हे पुस्तक वाचतील ते डॉ उज्वला करंडे यांना निमंत्रित करून 'त्यां'चं मनोगत ऐकण्यासाठी उत्सुक होतील.

# आदिवासींना जातीच्या दाखल्यांचे वाटप



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तहसील कार्यालय व वासांबे (मोहोपाडा) तलाठी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने वासांबे ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासी बंधू-भगिनींसाठी जातीचे दाखले वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात तीनशे आदिवासींनी फॉर्म भरून जमा केले होते. यानंतर या दाखल्यांचे वाटप गुरुवारी (दि. २२) वासांबे आदिवासी वाडीत करण्यात आले. या वेळी परिसरातील तीनशे आदिवासी लाभार्थ्यांना जातीचे दाखले वाटप करण्यात आले. आदिवासी बांधव-भगिनींना जातीचे दाखले मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे वातावरण दिसून आले.

दाखले वाटपावेळी माजी सरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य भाग्यश्री पवार, ताई पवार, तलाठी शितल मंदाडे, कोतवाल रवींद्र गायकवाड, पुंडलिक पवार आदी उपस्थित होते.

# अपहृत मुलींची सुटका

**पनवेल : वार्ताहर**

दोन वेगवेगळ्या प्रकरणात अल्पवयीन मुलीस शोधून पळवून नेणाऱ्या व्यक्तीवर कारवाई करण्यात आली आहे. दोन्ही अपहरणाबाबत गुन्हे नोंद करण्यात आले होते.

२५ सप्टेंबर २०२१ मध्ये कोपरखैरणे येथून एका १७ वर्षीय मुलीचे अपहरण झाले होते या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला होता, मात्र तिचा ठावठिकाणा सापडत नसल्याने पालक चिंतेत होते. हे प्रकरण अनैतिक मानवी प्रतिबंधक विभागाकडे वर्ग करण्यात आले. पोलिसांनी तपासात मात्र सातत्य राखल्याने ही युवती देवनार येथे असल्याची माहिती तांत्रिक तपासात पुढे येताच पोलीस पथकाने देवनार येथे जाऊन मुलीस ताब्यात घेतले. संशयित आरोपी रुपेश कंठे याची चौकशी सुरू आहे. या मुलीस कायद्याची प्रक्रिया पूर्ण करून रविवारी पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. दुसऱ्या प्रकरणात तळोजा पोलीस ठाणे परिसरातून येथून १२ तारखेला १७ वर्षीय मुलीचे अपहरण झाल्याचा गुन्हा नोंद करण्यात आला होता. या मुलीचा शोध घेताना काही प्रत्यक्षदर्शी माहितीगार आणि तांत्रिक तपासात ही युवती पेंढरगाव या ठिकाणी असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलीस पथकाने जाऊन तिची सोडवणूक केली. या प्रकरणी संजीव मुखिया याला ताब्यात घेतले.

# ब्राह्मण सभेतर्फे शालोपयोगी वस्तूंचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ब्राह्मण सभा, नवीन पनवेल या संस्थेच्या वतीने 'नेरे हायस्कूल, भागशाळा, विहिघर' या शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले.



या उपक्रमाला संस्थेच्या अध्यक्ष दिपाली जोशी, सचिव मंजुषा भावे, खजिनदार वैशाली सरदेशपांडे, सहखजिनदार आरती बोधनकर व सदस्या विनया वाळिंबे आदी महिला सभासद उपस्थित होत्या.

उपक्रमासाठी ब्राह्मण सभेच्या सभासदांनी सर्वांगिण योगदान दिले तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमाचे योग्य नियोजन केले.

ब्राह्मण सभा, नवीन पनवेल ही संस्था शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असून त्यांच्या वतीने वतीने प्रतिवर्षी विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. याबाबत माहिती देताना सचिव मंजुषा भावे यांनी सांगितले. समाजातील उपेक्षित, गोरगरीब व गरजू व्यक्तींपर्यंत पोहचून त्याना सहाय्य करण्याचे काम संस्था करत असते. विशेषतः गोरगरीब विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी संस्था प्रयत्नशील आहे.

# कळंबोलीत उभी केलेली दुचाकी चोरली

**पनवेल : वार्ताहर**

शीव-पनवेल महामार्गावर अंडा भुर्जी व चायनीज खाद्यपदार्थांची चव घेणे एका दुचाकीस्वाराला चांगलेच महाग पडले आहे. खारघर ते कळंबोली या पल्यावरील बेकायदा उभारलेल्या गाड्यांवर अंडा भुर्जी खाण्याऱ्या एका व्यक्तीची दुचाकी चोरीला गेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कळंबोली पोलीस स्थानकात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस तपास करत आहेत.

पनवेल येथे राहणारे कोंबडी विक्रेते हसन जाफर शेख हे मुंबई कुर्ला येथून दुचाकीवर पनवेलकडे जात होते. रस्त्यात त्यांना भूक लागल्यामुळे त्यांनी शीव पनवेल महामार्गावर रात्रीच्यावेळी अडीच वाजता कळंबोली येथील पुरुषार्थ पंपासमोर आपली दुचाकी थांबवली आणि महामार्गालगत असणाऱ्या गाड्यावर ते अंडा भुर्जी खाण्यासाठी गेले. अर्ध्या तासाने जेव्हा ते परत आले तेव्हा त्यांची दुचाकी गायब असल्याचे समजले. हसन यांनी दुचाकी शोधण्याचा प्रयत्न केला मात्र, ती सापडली नाही. अखेर त्यांनी कळंबोली पोलीस स्थानकात त्यांनी तक्रार दाखल केली. या प्रकरणी तपास सुरू आहे.



**पनवेल : भाजप कार्यकर्ते सतीश मालुसरे यांना वाढदिवसानिमित्त तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी जि. प. सदस्य अमित जाधव, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील आदी उपस्थित होते.**

# 'वाहनचालकांनी सुरक्षिततेचे नियम पाळावेत'

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

रस्ता सुरक्षिततेचे नियम पाळले तर अपघाताचे प्रमाण कमी होईन ते नियंत्रित होऊ शकतात, म्हणून रस्ता सुरक्षिततेचे नियम प्रत्येक वाहनचालकांनी पाळावेत, असा सल्ला सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी कुसुरकर यांनी नेरूळमध्ये बोलताना वाहनचालकांना दिला.

विजय नाहटा फाउंडेशन यांच्या सहकार्याने व नवी मुंबई रिक्षाचालक-मालक सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष दिलीप आमले यांच्या पुढाकाराने वाहतूक विभागात कार्यरत वाहतूक महिला पोलीस, रिक्षाचालक महिला व अन्य वाहनचालकांचा सत्कार वाहनचालक दिनाचे औचित्य साधून करण्यात आला. वाहन चालक हा प्रवाशांचा सारथी असतो. आपल्या कुटुंबाची जबाबदारीही त्याच्यावर असते त्यामुळे सुरक्षित वाहन चालवण्याची नैतिक जबाबदारी त्याच्यावर असते, असे अश्विन कुसुरकर यांनी सांगितले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपमहापौर अशोक गावडे, शिवसेना भारतीय कामगार संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मण तांडेल, चतुर्भुज टेंम्बरे आदींनी आपल्या भाषणात वाहनचालकांनी विविध प्रकारच्या नशेच्या सेवनापासून दूर राहण्याचा सल्ला दिला. या वेळी सुमारे १०० वाहनचालकांना मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.



# पनवेल येथे उद्योजकता विकास अभ्यासक्रम सुरू

**पनवेल : वार्ताहर**

यशवंत मेमोरियल ट्रस्ट पनवेल येथे एक वर्षाचा उद्योजकता विकास अभ्यासक्रम सुरू झालेला आहे.

हा अभ्यासक्रम आंत्रप्रेनर डेव्हलपमेंट इन्स्टिटयूट ऑफ इंडिया या संस्थेने प्रमाणित केलेला असून ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन भारत सरकार यांची मान्यता ह्या अभ्यासक्रमाला आहे. उद्योग व्यवसाय करण्याची तीव्र इच्छा असणारे नव-उद्यमी, सध्याचा उद्योग व्यवसाय, व्यावसायिक दृष्टिकोनातून अधिक समृद्ध करू इच्छिणारे उद्योजक ह्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतात. शैक्षणिक पात्रता ग्रॅज्युएट अथवा नॉन ग्रॅज्युएट अथवा डिप्लोमा अशी आहे.

उद्योजकता विकास कार्यक्रमाला उद्योजकीय तज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. ह्या अभ्यासक्रमामध्ये व्यवसाय संधीचा शोध, व्यवसायाच्या नाविन्यपूर्ण कल्पना, बाजार संशोधन आणि सर्वेक्षण, प्रकल्प अहवाल तयार करणे, व्यवसाय भांडवल उभारणीसाठी मार्गदर्शन, सरकारी कर्ज योजनांची माहिती, बँकांकडून व्यवसाय कर्ज मंजुरीसाठी मार्गदर्शन, व्यवसाय - उत्पादन क्षेत्र व सेवा क्षेत्र, विपणन आणि विक्री यांचा अंतर्भाव आहे. तरी इच्छुकांनी अधिक माहितीसाठी यशवंत मेमोरियल ट्रस्ट अशोका गार्डन्स धूतपापेश्वर आयुर्वेदिक कारखान्याजवळ महात्मा फुले मार्ग पनवेल ९८१९२४८७७१ अथवा ९८१९५४०४४८ येथे संपर्क साधावा.

# विजय आर्मी स्कूलमध्ये विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विजय आर्मी स्कूल व जुनिअर कॉलेज चिखले या सैनिकी शाळेत नुकतेच ग्रंथालयाचे उद्घाटन रेखा मल्ल्या यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षण उपसंचालक रामचंद्र जाधव हे उपस्थित होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य एम. के. मराठे होते. प्रास्ताविक कमांडंट पीव्हीआर कृष्णन यांनी केले. सूत्रसंचालन एस. बी. पवार यांनी, तर आभार मोरे मॅडम यांनी मानले. या वेळी सुधा कृष्णन व स्कूलसाठी इन्वर्टर डोनर जेसीनता मॅडम उपस्थित होत्या. माजी शिक्षण उपसंचालक श्री. जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



याचबरोबर दुसऱ्या सेशनमध्ये विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स ड्रेस पद्मा कपूर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या वेळी रोटरी क्लब सदस्य विद्या सुब्रमण्यम व रोटरी क्लब मेंबर्स शिवानी बंसल आदी उपस्थित होते. आभार श्री. लांबोळे यांनी मानले. ड्रेसवाटप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेरुळकर मॅडम यांनी केले.उपप्राचार्य सोपान पी. पाटील, पर्यवेक्षक श्री. बिराडे, पर्यवेक्षक श्री. अहिरे, सैनिक निदेशक पी. एस. पाटील, एस. टी. पाटील, नितीन बोरसे, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.

# शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळावे -डॉ. शिवराम भगत

## कोकण कृषी विद्यापीठाच्या वाहन चालक संघटनेतर्फे कर्जतमधील चाहुचीवाडी येथे विळेवाटप






**कर्जत : बातमीदार**

शेतकऱ्यांनी रासायनिक खते, कीटकनाशकांचा वापर कमी करून सेंद्रिय शेतीकडे वळावे आणि परंपरागत बियाणे जतन करावे, असे प्रतिपादन प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. शिवराम भगत यांनी कर्जत तालुक्यातील चाहुचीवाडी येथे केले.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठाच्या वाहन चालक संघटनेने प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र आणि दापोली येथील कृषी महाविद्यालय विस्तार शिक्षण विभाग यांच्या सहकार्याने कर्जत तालुक्याच्या चाहुचीवाडी येथील २५ आदिवासी शेतकरी जोडप्यांना वैभव विळ्याचे वाटप केले. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात डॉ. शिवराम भगत उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत होते.

वैभव विळ्याने भाताची कापणी जमिनी लगत होते. खोडकिडीचा प्रादुर्भाव कमी होतो आणि अधिक पेंढा मिळतो. या विळ्याची पकड अधिक चांगली असून वजनास हलका, समतोल साधणारा सहज कार्यक्षम कापणी करणारा असल्याने शेतकऱ्यांना खूपच उपयुक्त आहे, असे डॉ. शिवराम भगत यांनी या वेळी सांगितले.

वाहन चालक संघटनेचे अध्यक्ष राजेश विचारे, माजी उपसरपंच धर्मा निर्गुडा, विलास इलग यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी आदिवासी उपयोजनेंतर्गत विविध प्रशिक्षण कार्यक्रमांची माहिती देण्यात आली. कोकण कृषी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण विभाग प्रमुख डॉ. प्रमोद सावंत, विस्तार शिक्षण शास्त्रज्ज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने, कनिष्ठ संशोधन सहाय्यक डॉ. प्रवीण झगडे, वाहन चालक संघटनेचे सचिव संजय पवार, नवीन कांबळे, किसन ढोले यांच्यासह चाहुचीवाडी परिसरातील आदिवासी शेतकरी उपस्थित होते.




# शासनाच्या विविध योजनांमध्ये बँकांचे सहकार्य आवश्यक

## जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांचे प्रतिपादन

**अलिबाग : जिमाका**

केंद्र आणि राज्य शासनाच्या बँकांमार्फत राबवविल्या जाणाऱ्या विविध योजनांमध्ये बँकांचे सहकार्य आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी अलिबाग येथे केले.

जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात नुकताच त्रैमासिक आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर मार्गदर्शन करीत होते. कोणत्याही ठोस कारणाशिवाय बँकांनी कर्ज प्रस्ताव नाकारू नयेत, अशा सूचना त्यांनी या वेळी बँकांच्या उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

बँक ऑफ इंडियाच्या रायगड झोन मॅनेजर शंपा बिस्वास, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद शिंदे, रिझर्व बँक ऑफ इंडियाचे जिल्हा विकास अधिकारी नरेंद्र कोकरे, नाबार्डचे उपमहाव्यवस्थापक प्रदीप अपसुंदे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस. हरळय्या, जिल्हा उपनिबंधक सोपान शिंदे, मत्स्यव्यवसाय विभागाचे उपायुक्त एस. आर. भारती यांच्यासह जिल्ह्यातील सर्व बँकांचे प्रतिनिधी, शासनाच्या विविध विभागाचे प्रमुख या आढावा बैठकीला उपस्थित होते. या वेळी जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांनी बँकांच्या खरीप कर्ज वाटपाच्या कामाबाबत नाराजी व्यक्त केली.

प्रधानमंत्री कृषी सन्मान योजनेतील पात्र लाभार्थ्यांना किसान क्रेडिट कार्ड देण्यासाठी मेळावे घेणे, त्याचबरोबर शेतकऱ्यांना दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन इत्यादीसाठी किसान क्रेडिट कार्ड मंजूर करून बँकांनी आपले उद्दिष्ट ३० सप्टेंबर पूर्वी पूर्ण करावे, तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत आलेल्या सर्व अर्ज वेळेत निकाली काढण्याच निर्देश जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी या वेळी संबंधीत बँकांना दिले.

जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक विजय कुलकर्णी यांनी आढावा बैठकीमध्ये जून २०२२ पर्यंतचा विविध शासकीय योजनांमध्ये झालेल्या प्रगतीचा अहवाल सभेसमोर मांडला. त्यावेळी बोलताना त्यांनी जिल्ह्यातील बँकांचा सीडी रेशो ७७.३६टक्के असल्याचे सांगितले. खरीप पिक वाटपामध्ये २७८ कोटीच्या उद्दिष्टानुसार ३१ ऑगस्ट २०२२ अखेर १५८ कोटी ७२ लाख रुपयाचे किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत कर्ज वाटप झाल्याची माहिती दिली.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील बँकांकडे १६ सप्टेंबरअखेर ७३० प्रस्ताव प्राप्त झाले असून बँकांनी १०७ प्रकरण मंजूर केले आहेत, अशी माहिती या वेळी उपस्थितांना देण्यात आली. जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक विजय कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# माणगावमध्ये निराधार बांधवांना अन्नधान्य वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

विष्णुबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्रातर्फे माणगाव आणि शिरवली येथील एकूण ६० अपंग, मतिमंद, गरीब, निराधार बांधवांना शनिवारी अन्नधान्य, शिधावाटप करण्यात आले. सदरचे अन्नधान्य व शिधा शबरी सेवा समितीने उपलब्ध करून दिला होता. या वाटपाची सर्व व्यवस्था विष्णुबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्रांने केली होती. या वेळी शबरी सेवा समितीचे सचिव प्रमोदराव करंदीकर यांच्यासह विष्णुबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्राचे विश्वस्त आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



# पोलादपूर ग्रामदेवस्थानाच्या कमानीला तडे





**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री काळभैरवनाथ जोगेश्वरी देवस्थानाच्या कमानीला गेल्या काही दिवसांपासून मोठमोठे तडे गेलेले दिसून येत असून मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरणादरम्यान या कमानीला पोकलेनचा धक्का लागल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील मुंबई बाजूकडील वाहने येण्याच्या रस्त्याचा अंडरपासमध्ये प्रवेश होण्याच्या ठिकाणापासून पश्चिमेच्या दिशेला पोलादपूरचे ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ जोगेश्वरी देवस्थानकडे जाणाऱ्या रस्त्याची कमान आहे. तालुका सरकारी कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या देणगीतून बांधण्यात आलेल्या या कमानीमुळे देवस्थानाची माहिती मुंबई-गोवा महामार्गावरून ये-जा करणाऱ्या प्रवाशांना होत होती. याठिकाणी महामार्ग चौपदरीकरणाच्या कामातील काही वाहने आणि यंत्रांची ये-जा सुरू असताना एका पोकलेनचा धक्का लागल्याने कमानीचा पिलर आणि त्यावरील कमानीला तडा जाऊन काँक्रीटचा काही भाग कोसळला आहे. त्यामुळे नवरात्रौत्सवात श्रीकाळभैरवनाथ जोगेश्वरी देवस्थानाचे दर्शन घेण्यासाठी या कमानीखालून मंदिर परिसरात येणाऱ्या भाविकांच्या जीविताचा धोका निर्माण झाला आहे.

# कर्जतमधील डेंग्यूबाबत मुख्याधिकाऱ्यांनी साधला पॅथॉलॉजी चालकांशी संवाद

**कर्जत : बातमीदार**

गणेशोत्सवापासून कर्जत शहरात डेंग्यूचे रुग्ण आढळून येत आहेत. त्यामुळे नगर परिषदेचे मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी शुक्रवारी (दि. २३) शहरातील सर्व पॅथॉलॉजी चालकांसोबत बैठक घेऊन उपाययोजनांबाबत चर्चा केली. या वेळी जनजागृती मोहीम पुन्हा सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला.



कर्जत शहरात मागील महिन्यात डेंग्यूचे रुग्ण आढळून आले, त्यानंतर कर्जत उपजिल्हा रुग्णालयाकडून तपासणी मोहीम घेण्यात आली. त्यावेळी शहरातील काही ठराविक भागात डेंग्यूचे रुग्ण आढळून आले होते. त्यानंतर नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी लोकप्रतिनिधींच्या समवेत शहरातील सर्व भागात फिरून डेंग्यू प्रतिबंधक उपाययोजना करण्याचे आवाहन केले होते. मात्र शहरातील डेंग्यू रुग्णांची संख्या कमी होत नसल्याने मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी शुक्रवारी कर्जत शहरातील सर्व पॅथॉलॉजी चालकांची बैठक घेतली. मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात झालेल्या या बैठकीला कल्पेश पटेल, अबिद खान, बी. आर. माने, कल्पेश कुलकर्णी, अक्षदा विशे यांच्यासह शहरातील सर्व पॅथॉलॉजी चालक आणि पालिकेचे आरोग्य निरीक्षक सुदाम म्हसे होते.

रक्त तपासणीत डेंग्यूचे रुग्ण आढळल्यास त्यांची माहिती तात्काळ नगर परिषदेला कळवावी, असे मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी या बैठकीत सुचविले.

# वांगणी रेल्वेस्थानक परिसरात बेवारस व्यक्तीचा मृतदेह

**कर्जत : बातमीदार**

वांगणी ते बदलापूर रेल्वे स्थानकांदरम्यान लोकल गाडीचा धक्का लागून एका अनोळखी पुरूष व्यक्तीचा मृत्यू झाला. अंदाजे ३५ ते ४० वर्षे वय असलेल्या मृत व्यक्तीचे शरीर सडपातळ असून त्याची उंची साडेपाच फूट, निमगोरा, चेहरा उभट, डोकीचे केस काळे साधारण वाढलेले आहेत. अंगावर लाल काळ्या पट्यापट्यानंचा रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट, आत सफेद रंगाचा सेंडो बनियन आणि निळसर रंगाची जीन्स पॅन्ट आहे. या बेवारस मृत व्यक्तीबद्दल कोणतीही माहिती मिळाल्यास संबंधित व्यक्तींनी कर्जत रेल्वे पोलीस ठाण्याचे सहाय्यक उपनिरीक्षक कसबे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# माता सुरक्षित तर घर सुरक्षित मोहीम

## आढावा घेण्याकरिता जिल्हा कृती दलाची बैठक

**अलिबाग : जिमाका**

जिल्ह्यात २७ सप्टेंबर रोजी माता सुरक्षित तर घर सुरक्षित ही मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्याकरिता जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि. २२) जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात जिल्हा कृती दलाची बैठक घेण्यात आली.



रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्यसंपर्क) डॉ. गजानन गुंजकर, उपजिल्हाधिकारी स्नेहा उबाळे, जिल्हा प्रशासन अधिकारी शाम पोशट्टी, डॉ. प्रताप शिंदे, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. शितल जोशी यांच्यासह पनवेल महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी, भारतीय परिचारिका असोसिएशन तसेच अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रतिनिधी आणि शिक्षण, आदिवासी विकास विभाग, महिला व बालकल्याण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या मोहिमेंतर्गत राज्यातील २१ वर्षावरील सर्व महिला माता, गरोदर स्त्रिया यांची आरोग्य तपासणी, प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणे, सुरक्षित व सुदृढ आरोग्यसाठी समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देणे, जिल्ह्यातील ५४ प्राथमिक आरोग्य केंद्र, २८० आरोग्य केंद्रे, दोन भरारी पथके व प्रत्येक गावात एक दिवस आरोग्य व पोषण दिनाच्या दिवशी आरोग्य सेवा उपलब्ध करण्यात येतील.

इच्छुकांनी माता सुरक्षित तर घर सुरक्षित या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी या वेळी केले आहे.

# धाटावच्या मोरे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन

**रोहे : प्रतिनिधी**

राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिनानिमित्त धाटाव येथील एम. बी. मोरे महिला महाविद्यालयात शनिवारी (दि २४) संस्थेचे संचालक अशोक मोरे यांच्या उपस्थितीत एनएसएसचे ध्वजारोहण करण्यात आले तसेच सर्व विद्यार्थिनींना स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाची शपथ देण्यात आली. या वेळी १०६ विद्यार्थिनी आणि शिक्षक उपस्थित होते.

मोरे महाविद्यालयाच्या एनएसएस विभागातील ३६ विद्यार्थिनींनी रोह्यातील मेहेंदळे हायस्कूलच्या विद्यार्थ्यासमोर महिला सक्षमीकरण या विषयावरील पथनाट्य सादर केले. या वेळी शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य प्रसन्न म्हसाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली एनएसएस विभागाच्या प्रा. ममता बिंद आणि प्रा. प्रतिमा भोईर यांनी राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमाचे नियोजन केले होते.



# आदर्श पतसंस्थेला राज्यस्तरीय दीपस्तंभ पुरस्कार प्रदान

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनतर्फे अलिबागमधील आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेला राज्यस्तरीय दीपस्तंभ पुरस्कार २०२२ देऊन गौरविण्यात आले.

उत्कृष्ट काम करणाऱ्या राज्यातील पतसंस्थांना महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनतर्फे दरवर्षी दीपस्तंभ पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. कोकण विभागात आदर्श पतसंस्थेला दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार देण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनची ३३ वार्षिक सर्वसाधारण सभा १९ सप्टेंबर रोजी झाली. या वेळी महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते दीपस्तंभ पुरस्कार २०२२ चे वितरण करण्यात आले. आदर्शचे अध्यक्ष सुरेश पाटील, उपाध्यक्ष सतीश प्रधान, संचालक अनंत म्हात्रे, अभिजीत पाटील यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे, कार्याध्यक्ष राजूदास जाधव, महासचिव डॉ. शांतीलाल सिंगी, खजिनदार दादाराव तुपकर, उपकार्याध्यक्ष सुदर्शन भालेराव, संचालक शशिकांत राजोबा, संचालक चंद्रकांत वंजारी, संचालक सुरेश पाटील, संचालक सागर चौगुले, तज्ज्ञ संचालक दिपक पटवर्धन, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेखा लवांडे आदि मान्यवर या वेळी उपस्थित होते.

# नागोठण्यात सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाची सभा

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक सेवाभावी संघाच्या जिल्हा कार्यकारी मंडळाची सभा नुकताच नागोठण्यात मनोज शिंदे यांच्या निवासस्थानी घेण्यात आली. संघाचे सरचिटणीस रमेश लखिमले यांनी नवीन कार्यकारिणीची ओळख करुन देत मागील वर्षाचा अहवाल सादर केला.



संघाचे निवासी जिल्हाध्यक्ष तुकाराम खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत ह. म. म्हात्रे, सी. रा. महाडिक, व. ठ. शिंदे, र. ल. करंजे, पां. ग. खैरे, स. ग. कोळी, सु. गो. मेणे यांनी आपले विचार व संघटनेची ध्येयधोरणे सांगून नवीन कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या.

या विशेष कार्यकारिणी बैठकीत सेवानिवृत्तांच्या प्रलंबित प्रश्नावर चर्चा करून वैयक्तिक प्रश्नांचा आढावा घेण्यात आला. काही सेवानिवृत्तांची मूळ सेवापुस्तके गहाळ झाली आहेत. १९७२ नंतर शिक्षण खात्यात लागलेले अप्रशिक्षित शिक्षकांना कोर्टाचा आदेश व शिक्षक संचालकांचा आदेश असूनही निवृत्तीवेतन मंजूर होत नाही. निवड श्रेणीतील वंचित शिक्षकांना श्रेणीचा लाभ मिळालेला नाही तसेच निवड श्रेणीत अन्य त्रुटी आहेत त्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. याप्रकरणी जिल्हा शिक्षणाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्याविषयी ठरावही या वेळी घेण्यात आला. नवीन २०२२-२३ या वर्षाकरिता पावती पुस्तके छपाई करणे व संघटनेच्या बचत खात्यावर आर्थिक व्यवहार करण्याचा अधिकार देण्याचा ठरावही घेण्यात आला. तुकाराम खांडेकर यांनी आभार मानले.

## भारत-ऑस्ट्रेलिया ट्वेन्टी-२० मालिका

# आज अंतिम लढत



**हैदराबाद : वृत्तसंस्था**

कर्णधार रोहित शर्माच्या (२० चेंडूंत नाबाद ४६ धावा) आक्रमक खेळीच्या बळावर भारताने दुसऱ्या ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियावर सहा गडी राखून मात केली. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली आहे. तिसरा व अंतिम सामना रविवारी (दि. २५) हैदराबाद येथे होणार आहे.

पाऊस आणि त्यानंतर मैदानातील काही भाग ओला असल्याने नागपूर येथील दुसरा



सामना सुरू होण्यासाठी विलंब झाला. अखेर हा सामना आठ-आठ षटकांचा करण्यात आला. भारताने नाणेफेक जिंकून फलंदाजीचे आमंत्रण दिल्यानंतर ऑस्ट्रेलियाने ५ बाद ९० अशी धावसंख्या उभारली. कर्णधार आरोन फिंच (१५ चेंडूत ३१) आणि मॅथ्यू वेड (२० चेंडूंत नाबाद ४३) यांनी फटकेबाजी केली.

ऑस्ट्रेलियाने दिलेले ९१ धावांचे लक्ष्य भारताने ७.२ षटकांत चार गड्यांच्या मोबदल्यात गाठले. रोहितने नाबाद ४६ धावांच्या खेळीत चार चौकार आणि चार षटकारांची आतषबाजी केली. ॲडम झॅम्पाच्या फिरकीपुढे भारताची मधली फळी ढेपाळली, मात्र अखेरच्या षटकात नऊ धावांची आवश्यकता असताना दिनेश कार्तिकने एक षटकार आणि एक चौकार मारत भारताला विजय मिळवून दिला.






## टेनिस सम्राट फेडररला भावनिक निरोप

**लंडन : वृत्तसंस्था**

स्वित्झर्लंडचा अव्वल टेनिसपटू रॉजर फेडरर याने काही दिवसांपूर्वीच निवृत्ती जाहीर केली होती. ४१ वर्षीय फेडरर शुक्रवारी अखेरचा सामना खेळला. सामन्यानंतर त्याला आपले अश्रू आवरणे कठीण झाले. या वेळी चाहत्यांनीच नाही, तर जोडीदार राफेल नदाल यानेही फेडररला भरल्या डोळ्यांनी भावनिक निरोप दिला.



या सामन्यादरम्यान स्पॅनिश टेनिस स्टार राफेल नदाल फेडररचा जोडीदार होता. आपल्या शेवटच्या सामन्यात मात्र फेडररला विजयाची गवसणी घालता आली नाही. लंडन येथे खेळवण्यात आलेल्या या सामन्यात अमेरिकेचे फ्रान्सिस टियाफो आणि जॅक सॉक यांनी सामना ४-६, ७-६ (२), ११-९ असा जिंकला. या मॅचनंतर फेडररला भावनिक निरोप देण्याला आला.

दरम्यान, या क्षणांचे व्हिडीओ तुफान व्हायरल झाले आहेत. या व्हिडीओत सामन्याच्या अखेरीस फेडररच्या डोळ्यांतील अश्रू दिसतात. त्याच्याच शेजारी बसलेला राफेल नदालही आपले अश्रू रोखू शकला नाही. या वेळी फेडररने तेथे उपस्थित सर्बियाचा स्टार प्लेअर नोवाक जोकोविच यांच्यासह इतर खेळाडूंची भेट घेऊन टेनिस खेळाला निरोप दिला. या वेळी सर्व जण भावूक झाले होते.

## प्रशिक्षक द्रविडच्या ‘त्या’ कृतीवर कौतुकाचा वर्षाव

**नागपूर** : ऑस्ट्रेलियाविरुद्ध सुरू असलेल्या टी-२० मालिकेच्या दुसऱ्या सामन्यात कर्णधार रोहित शर्माच्या आक्रमक खेळीच्या बळावर भारताने सहा गडी राखून विजय मिळवला. या सामन्यानंतर रोहितचे जितके कौतुक होत आहे तितकेच प्रशिक्षक राहुल द्रविडचेही होत आहे. द्रविडची सासरवाडी असणाऱ्या नागपूरमधील सामन्यानंतर त्याने केलेली कृती सध्या कौतुकाचा विषय ठरत आहे.

पाऊस आणि त्यानंतर मैदानातील काही भाग ओला असल्याने सामना सुरू होण्यासाठी विलंब झाला. या सामन्यानंतर भारतीय खेळाडू जल्लोष करीत असताना प्रशिक्षक राहुल द्रविड मात्र कमी षटकांचा का असेना पण हा सामना खेळवण्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या मैदानावरील कर्मचाऱ्यांच्या म्हणजेच ग्राऊण्ड्समनच्या भेटीसाठी गेला. द्रविडने प्रत्येक ग्राऊण्डमनशी हस्तांदोलन केले व त्यांना धन्यवाद म्हटले.
























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com